
राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक २९
◆ रायगड, नवी मुंबई
www.ramprahar.com
◆ शनिवार, १५ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## महाराष्ट्रातील पाच अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पदक जाहीर



**नागपूर** : पोलीस व नागरी संरक्षण दलात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल दिल्या जाणाऱ्या मानाच्या राष्ट्रपती उत्कृष्ट सेवा पदकांसाठी महाराष्ट्रातील पाच पोलीस अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला गृह मंत्रालयातर्फे महाराष्ट्रातील पोलीस, कारागृह, अग्निशमन व होमगार्ड सेवेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांना राष्ट्रपती पदक आणि शौर्य व गुणवत्तापूर्ण सेवापदक जाहीर केले आहेत. केंद्रीय गृह मंत्रालयाने १४ ऑगस्टला पत्र जारी करीत सन्मानित केलेल्यांची घोषणा केली. यामध्ये महाराष्ट्रातील अपर पोलीस महासंचालक शिरीष जैन, उपपोलीस अधीक्षक सुभाष भुजबळ, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संजय वायचळे यांची वर्णी लागली. कारागृह सेवागटात सुभेदार संजीव घाणेकर, हवालदार संजय तळवारे यांची गुणवत्तापूर्ण सेवा पदकासाठी निवड करण्यात आली आहे.

अंतरंग
‘महाराष्ट्राची ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीकडे वाटचाल’/२
ऑनलाईन गेमिंगच्या नादात सव्वा कोटींचा गंडा/६
गॉल कसोटीमध्ये फिरकीचा लागणार कस/८

# स्वातंत्र्याचा आनंद साजरा करताना फाळणीच्या वेदना विसरता येणार नाहीत -आमदार प्रशांत ठाकूर

## पनवेलमध्ये विस्थापितांच्या वेदना आणि त्यागाला उजाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास समजून घेताना देशाच्या फाळणीचा वेदनादायी इतिहासही सर्वांना माहिती असणे तितकेच गरजेचे आहे. स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद साजरा करताना फाळणीमुळे देशवासीयांना सोसाव्या लागलेल्या वेदना, दुःख, यातना आणि हुतात्म्यांच्या त्यागाचे स्मरण करून त्यांच्या बलिदानाला अभिवादन केले पाहिजे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल महानगरपालिकेच्या



वतीने आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आलेल्या फाळणी भयावहता स्मृतिदिन कार्यक्रमात केले.

या कार्यक्रमाला महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार, नगरसेवक अजय बहिरा, प्रिती जॉर्ज, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त नानासाहेब कामठे, स्वरूप खारगे, मंगला माळवे, लेखाधिकारी संग्राम ऱ्होरकाटे आणि भाजपचे जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील यांच्यासह फाळणीमुळे बाधित झालेली कुटुंबे आणि स्वातंत्र्यसेनानींचे वारसदार उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना महापौर नितीन पाटील यांनी १५ ऑगस्ट या गौरवशाली दिवसाच्या आदल्या दिवशी घडलेल्या फाळणीच्या कटू स्मृतींना उजाळा दिला. (पान २ वर..)

## दिल्ली एअरपोर्ट, उच्च न्यायालयासह सहा ठिकाणी बॉम्बची धमकी

**नवी दिल्ली** : स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येलाच दिल्लीत मोठी खळबळ उडाली. दिल्ली उच्च न्यायालय, दिल्ली विमानतळासह सहा ठिकाणी बॉम्बची धमकी देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दिल्लीत १५ ऑगस्टच्या पार्श्वभूमीवर मोठी तयारी सुरू आहे, मात्र १५ ऑगस्टच्या पूर्वसंध्येलाच अनेक सरकारी कार्यालयांना धमकीचा ई-मेल आल्यामुळे खळबळ उडाली. या घटनेमुळे दिल्लीत भीतीचे वातावरण पसरले होते.

बॉम्बच्या धमकीनंतर दिल्ली पोलीस व स्थानिक प्रशासन अलर्ट झाले असून चौकशी सुरू करण्यात आली. अद्याप यापैकी कोणत्याही ठिकाणी संशयास्पद वस्तू आढळली नाही, अशी माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली.




## संगीतसाधनेचा डिजिटल स्वरमंच

### पं. उमेश चौधरी यांच्या वेबसाइटचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते अनावरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शास्त्रीय संगीत क्षेत्रात आपल्या सुरेल गायकीने, अखंड संगीतसाधनेने आणि समाजाभिमुख कार्याने स्वतंत्र ओळख निर्माण करणारे रायगडभूषण पं. उमेश निवृत्तीबुवा चौधरी यांनी संगीत क्षेत्रातील आपल्या कार्याची माहिती, संगीतप्रेमींसाठी उपयुक्त साहित्य तसेच आपल्या कलाप्रवासाची ओळख करून देणारी वेबसाइट सुरू केली आहे. या वेबसाइटचे अनावरण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

खारघर येथे झालेल्या कार्यक्रमास नादब्रम्ह साधना मंडळाचे संस्थापक तथा विख्यात शास्त्रीय व भजन गायक हभप निवृत्तीबुवा चौधरी, अध्यक्ष वसंतशेठ पाटील, माजी नगरसेवक शंकर म्हात्रे, अनंता ठाकूर, नारायणबुवा पाटील यांच्यासह संगीत आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. (पान २ वर..)

## पांडवकडा धबधब्यात बुडून तरुणाचा मृत्यू

**खारघर : प्रतिनिधी**

खारघर येथील पांडवकडा धबधब्यात बुडून एका २३ वर्षीय तरुणाचा शुक्रवारी दुपारी मृत्यू झाला. मृत तरुणाचे नाव आदित्य विश्वकर्मा असे असून या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

खारघर अग्निशमन केंद्राकडून मिळालेल्या माहितीनुसार आदित्य विश्वकर्मा हा पनवेलचा रहिवासी होता. तो मित्रांसह पांडवकडा धबधबा परिसरात फिरण्यासाठी गेला होता. पावसामुळे धबधब्याचा प्रवाह वाढलेला असताना तो पाण्यात उतरला. (पान २ वर..)






## गॅस पाईपलाईन प्रकल्पामुळे न्हावे खाडी परिसरात

# स्थानिक मच्छीमारांचे आर्थिक नुकसान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीमार्फत गव्हाण, शिवाजीनगर, न्हावे आणि न्हावे खाडी परिसरात गॅस पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु आहे. मात्र, या प्रकल्पामुळे स्थानिक मच्छिमारांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत असून त्यांच्या रोजगारावर गदा आली आहे.

खाडी पात्रातील कामाच्या अडथळ्यांमुळे आणि वाढत्या प्रदूषणामुळे मासे दूर निघून गेल्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राधा राम मच्छिमार संस्था आणि स्थानिक मच्छिमारांनी शुक्रवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन ही समस्या तातडीने सोडवण्याची मागणी निवेदनाद्वारे केली.

खाडी पात्रात सुरू असलेल्या पाईपलाईनच्या कामा दरम्यान निर्माण होणारे दूषित सांडपाणी थेट समुद्राच्याआणि खाडीच्या पाण्यात सोडले जात आहे. यामुळे जलप्रदूषण वाढून खाडीतील जैवविविधता धोक्यातआली आहे.यामुळे स्थानिक कोळी बांधव आणि महिलांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.या गंभीर समस्येची दखल घेऊन स्थानिक मच्छिमारांच्या शिष्टमंडळाने रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊनहे समस्या मार्गी लावण्याचे निवेदन दिले. या प्रसंगी राधा राम मच्छिमार संस्थेचे चेअरमन नामदेव ठाकूर,स्थानिक ग्रामपंचायत सदस्य नरेश मोकल, राजकिरण कोळी यांच्यासह संस्थेचे इतर पदाधिकारी आणि महिला उपस्थित होत्या.



**खांदा कॉलनी** : पनवेल मध्ये एसआयआर नोंदणी मोहीम अत्यंत वेगाने सुरू असून, या पार्श्वभूमीवर खांदा कॉलनी येथे नागरिकांच्या सुविधेसाठी विशेष मदतकक्ष सुरू करण्यात आला आहे. या मदत कक्षाला पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी शुक्रवारी भेट देऊन येथील कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. खांदा कॉलनीतील नागरिकांना एसआयआर नोंदणी प्रक्रिया सुलभ व्हावी तसेच नॅशनलकॉमन मोबिलिटी कार्ड साठीचे अर्ज सहज भरता यावेत, या उद्देशाने या मदत कक्षात सुविधा उपलब्ध करूनदेण्यात आली आहे. पाहणी दरम्यान परेश ठाकूर यांनी केंद्रावर येणाऱ्या नागरिकांच्या सुविधांचा, नोंदणीप्रक्रियेच्या वेगाचा आणि एनसीएमसी कार्ड अर्ज प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला. या वेळी नगरसेवकदशरथ म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# हर घर तिरंगा रॅलीत रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा उत्स्फूर्त सहभाग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये राष्ट्रध्वजाविषयी अभिमान व आदर निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजना (NSS) युनिटच्या वतीने, पनवेल महानगरपालिकेच्या सहकार्याने 'हर घर तिरंगा' रॅलीचे आयोजन गुरुवार, दि. १३ ऑगस्ट रोजी खारघर येथे करण्यात आले होते.

या रॅलीमध्ये महाविद्यालयातील NSS स्वयंसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. हातात तिरंगा ध्वज घेत विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. 'हर घर तिरंगा', 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' अशा घोषणांमधून राष्ट्रप्रेमाची भावना व्यक्त करण्यात आली.रॅलीच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर तिरंगा फडकवावा, राष्ट्रध्वजाचा सन्मान राखावा आणि स्वातंत्र्याच्या मूल्यांप्रती आपली बांधिलकी जपावी, असा संदेश देण्यात आला.

विद्यार्थ्यांनी नागरिकांशी संवाद साधत राष्ट्रीय एकात्मता, देशभक्ती, नागरिक कर्तव्य आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे महत्त्व याबाबत जनजागृती केली.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण, संघभावना आणि राष्ट्रसेवेची भावना अधिक दृढ झाली असे महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी नमूद केले.

तसेच महाविद्यालय आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त सहभागातून समाजात सकारात्मक संदेश पोहोचविण्यात आला.'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून देशाच्या स्वातंत्र्याचा गौरव, राष्ट्रध्वजाचा सन्मान आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश खारघर परिसरात प्रभावीपणे पोहोचविण्यात आला. रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी NSS विभागातील स्वयंसेवक, महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी तसेच पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले."तिरंगा हा केवळ राष्ट्रध्वज नसून तो आपल्या स्वातंत्र्याचा, अभिमानाचा आणि एकतेचा प्रतीक आहे", हा संदेश देत रॅली उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त दापोली-पारगाव विद्यालयात वह्यांचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे (अमृतमहोत्सव) औचित्य साधूनरामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने अनंत पांडुरंग भोईर विद्यालय व रघुनाथ शेठ जितेकर ज्युनिअर कॉलेज, दापोली –पारगाव येथील गरीब, गरजू आणि आदिवासी विद्यार्थ्यांना तब्बल ३५०० वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम गुरुवार, दिनांक १३ ऑगस्टरोजी सकाळी ११ वाजता विद्यालयाच्या प्रांगणात उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पनवेलच्या सभापती रंजना सदाशिव वास्कर, जिल्हा परिषद सदस्या सोनाली अनुज जितेकर, आणि पंचायत समिती सदस्या मनीषा गजानन पाटील उपस्थित होत्या. तसेच विद्यालयाचे चेअरमन तथा माजी सभापती प्रकाश जितेकर, दापोलीचे माजी उपसरपंच गजानन पाटील, र.शि.संस्थेच्या माजी मॅनेजिंग कौन्सिल सदस्या संजीवनी म्हात्रे आणि भाजपाचे खंदे कार्यकर्ते मच्छिंद्र कटेकर यांच्या समवेत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका पुष्पलता ठाकूर ,पर्यवेक्षिका घोडके संजीवनी मॅडम यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मॅडम यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊनस्वागत केले.

जिल्हा परिषद सदस्या सोनाली जितेकर यांनी रामशेठ ठाकूर साहेबांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा गौरव केला. ठाकूर साहेबांनी नेहमीच समाजातील शेवटच्या घटकाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत. वही वाटपाचा हा उपक्रम त्यांच्या याच दातृत्व भावनेची साक्ष देत असे त्या म्हणाल्या. तर ग्रामस्थ व माजी उपसरपंच गजानन पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की,साहेबांची दानशूर वृत्ती आणि गरीब विद्यार्थ्यांबद्दलची तळमळ आम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यालयातील गरीब –गरजू व आदिवासी विद्यार्थ्यांना वह्यांचे वितरण करण्यात आले.

शैक्षणिक साहित्याची ही मदत मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हसू उमलले. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचाशिक्षणाचा प्रवास सुकर व्हावा, या हेतूने राबविलेल्या या उपक्रमाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका.पुष्पलता ठाकूर यांनीलोकनेते रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे व आदरणीय साहेबांचे मनापासून आभार मानले व त्यांना दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पाटील व्ही.आर.यांनी केले.

## १२ वर्षांनंतर आरोपीला बेड्या

**पनवेल** : एका गंभीर फसवणूक प्रकरणात अटकेनंतर जामिनावर सुटून तब्बल १२ ते १३ वर्षांपासून पोलिसांना हुलकावणी देणाऱ्या फरार आरोपीला कळंबोली पोलिसांनी अखेर बेड्या ठोकल्या आहेत. मोबाइल लोकेशन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अचूक वापर करून पोलिसांनी तळोजा परिसरातून या आरोपीला जेरबंद केले. आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे. रूपेश कालगुडेने सहा लाख ७० हजारांची फसवणूक केली होती. याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता.

## तीन बोकडांची चोरी

**नवीन पनवेल** : मोकळ्या प्लॉटमध्ये खुंट्याला बांधून ठेवलेल्या तीन बोकडांची चोरी केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात ११ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जकीरा शेख या तळोजा, फेज वन येथे राहत असून ५ ऑगस्ट रोजी त्यांनी मुस्कान कॉर्नर, तळोजा फेज वन येथील मोकळ्या प्लॉटमध्ये तीन बोकड खुंट्याला बांधून ठेवले होते. चोराने ते चोरून नेले. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## लग्नास नकार दिल्याप्रकरणी गुन्हा

**नवीन पनवेल** : २३ वर्षीय तरुणीसोबत शारीरिक संबंध ठेवून तिच्यासोबत लग्नास नकार दिल्याप्रकरणी हरगुनप्रीत सत्विंदरसिंग लुबाना (रा. नंदनवन सोसायटी, सेक्टर २६, कामोठे) याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात ११ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील तरुणी नवीन पनवेलमध्ये राहत असून आरोपी हरगुनप्रीत लुबाना याने इन्स्टाग्रामवर ओळख आणि मैत्री करून पीडित तरुणीला लग्नाचे आमिष दाखवले आणि कामोठे तसेच कळंबोली, पुणे, नाशिक, त्रंबकेश्वर, महाबळेश्वर, माथेरान, अलिबाग, नवीन पनवेल या ठिकाणी घेऊन जाऊन शारीरिक संबंध प्रस्थापित केले आणि पीडितेशी लग्न करण्यास नकार दिला.

## राडारोडा पडून महिला जखमी

**पनवेल** : तालुक्यातील कोनगाव येथे बांधकाम सुरू असलेल्या इमारतीला लावलेली सुरक्षा जाळी अचानक तुटल्याने त्यात साचलेला राडारोडा खाली काम करीत असलेल्या महिला कामगाराच्या अंगावर कोसळला. या दुर्घटनेत विनंती सुरेश सिंग (३०) गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी संबंधित कंपनीविरोधात गुन्हा दाखल केला. या दुर्घटनेत सिंग यांच्या डोक्याला, खांद्याला आणि पायाला गंभीर दुखापत झाली.

# गव्हाण विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची श्री साई नर्सरीला क्षेत्रभेट

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज,गव्हाण-कोपर येथे कार्यशिक्षण विषयांतर्गत विविध शैक्षणिक व अनुभवाधारित उपक्रम राबविले जातात.याच उपक्रमाचा एक भाग म्हणून इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी वहाळ येथील श्री साई नर्सरी नर्सरीला दोन दिवसीय क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते.



मंगळवार, दिनांक ११ ऑगस्ट व बुधवार, दिनांक १२ ऑगस्ट या दोन दिवसांत इयत्ता सहावीच्या अ, ब व क या तिन्ही तुकड्यांतील विद्यार्थ्यांनी या क्षेत्रभेटीत उत्स्फूर्त सहभाग घेतला.विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशिक्षण विभागप्रमुख सारिका ठाकूर व उपशिक्षिका चारुशीला ठाकूर यांच्या नियोजनातून ही क्षेत्रभेट यशस्वीपणे पारपडली.

क्षेत्रभेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी नर्सरीतील विविध प्रकारची फुलझाडे, शोभिवंत वनस्पती, फळझाडे तसेच औषधी वनस्पतींची प्रत्यक्ष पाहणी केली. वनस्पतींचे प्रकार, त्यांची लागवड, संगोपन, वाढीसाठी आवश्यक घटक, पर्यावरणातील महत्त्व तसेच दैनंदिन जीवनातील उपयोग याबाबत विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून माहिती जाणून घेतली.या क्षेत्रभेटीचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यालयातील कर्मचारी जनार्दन खैरे दादा यांनी नर्सरीमध्ये असलेल्या विविध वनस्पतींची विद्यार्थ्यांना ओळख करून देत त्यांच्या वैज्ञानिक तसेच आयुर्वेदिक महत्त्वाची सविस्तर माहिती दिली. विविध वनस्पतींचे मानवी जीवनातील उपयोग, त्यांचे पर्यावरणीय महत्त्व आणि आयुर्वेदाच्या दृष्टीने असलेले महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना सोप्या व मनोरंजकपद्धतीने समजावून सांगितले.

यावेळी जनार्दन खैरे दादा व उपशिक्षिका चारुशीला ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना विविध वनस्पतींचे निरीक्षण करण्यास प्रवृत्त केले. वनस्पतींची ओळख, त्यांची निगा,योग्य लागवड, पाणी व मातीचे महत्त्व तसेच झाडांचे संवर्धन याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे पाठ्यपुस्तकातील वनस्पतीविषयक ज्ञान विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून समजून घेण्याचीअनोखी संधी मिळाली.निसर्गाच्या सान्निध्यात प्रत्यक्ष निरीक्षण, अनुभव आणि ज्ञानाचा आनंद घेत विद्यार्थ्यांची ही दोन दिवसीय क्षेत्रभेट अविस्मरणीय ठरली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्येपर्यावरणाविषयी प्रेम, वृक्षसंवर्धनाची जाणीव, औषधी वनस्पतींबद्दल कुतूहल निर्माण होण्यास मदत झाली.

## तीन लाख ७१ हजारांचा अपहार

**पनवेल : प्रतिनिधी**

बँकेत भरणा करण्यासाठी दिलेली रक्कम बँकेत न भरता तिचा अपहार केल्याप्रकरणी लोकेश पवार याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात ११ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील फिर्यादी नारायण बाबा श्रीराम हे रोडपाली गाव, शिवशक्ती एंटरप्राइजेस, कळंबोली येथे राहत असून आरोपी लोकेश पवार हा मोतीलाल ओसवाल होम फायनान्स रिकव्हरी ऑफिसर म्हणून नोकरी करीत होता.

मोतीलाल ओसवाल याने नारायण बाबा यांना विश्वासात घेतले आणि फिर्यादी यांच्या कर्जाची उर्वरित पाच लाख १२ हजार रुपये रकमेची दोन लाख एक हजार रुपये एवढ्या रकमेत सेटलमेंट करून देतो असे सांगितले आणि नारायण बाबा यांच्याकडून तीन लाख ७१ हजार रुपये घेऊन बँकेत भरणा करणे आवश्यक असताना बँकेत भरणा केली नाही.

याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात ११ ऑगस्ट रोजी मोतीलाल ओसवाल होम फायनान्स रिकव्हरी ऑफिसर याचेवर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

### पनवेल महानगरपालिकेतर्फे

# महिलांसाठी भव्य 'श्रावण महोत्सव २०२६'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने 'श्रावण महोत्सव २०२६' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन मंगळवार, दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २ वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे करण्यात आले आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व महिला भगिनींसाठी हा कार्यक्रम असून प्रवेश विनामूल्य असून महापालिका क्षेत्रातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

श्रावण महिन्यातील पारंपरिक सणवारांना, संस्कृतीला कला मनोरंजनाची जोड देत महिलांच्या उत्साहाला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महिलांसाठी एक दिवस आनंदाचा, उत्साहाचा आणि सक्षमीकरणाचा!' ही या महोत्सवामागील संकल्पना आहे.

महोत्सवात प्रसिद्ध अभिनेता दिगंबर नाईक, अभिनेत्री सायली पराडकर तसेच लावणी सम्राट आश्मिक कामठे यांची विशेष उपस्थिती व सादरीकरण आकर्षण ठरणार आहे. यासोबतच पारंपरिक मंगळागौर, लावणीसह विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच महिलांसाठी आकर्षक लकी ड्रॉ व बक्षिसांची मेजवानी असणार आहे.

कार्यक्रमास पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर व विधानपरिषद सदस्य आमदार विक्रांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन जयराम पाटील असणार आहेत. तसेच विविध पदाधिकारी व अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

> **"श्रावण महोत्सवाच्या माध्यमातून महिला भगिनींना मनोरंजन, पारंपरिक संस्कृती, कला आणि आनंदाने भरलेला एक हक्काचा दिवस अनुभवता यावा, हा या आयोजनाचा मुख्य उद्देश आहे. यासोबतच महिलांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित विविध विषयांची उपयुक्त माहितीही सहज-सोप्या पद्धतीने त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या महोत्सवातून करण्यात येणार आहे."**
>
> **-ममता प्रितम म्हात्रे**
> सभापती, महिला व बालकल्याण समिती, पमपा

## संपादकीय

# सामूहिक प्रयासांचे बळ

भारताकडे पाहण्याचा जगाचा दृष्टिकोन आज बदलला आहे. समृद्ध आणि विकसित भारताची निर्मिती हीच स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाला खरी आदरांजली ठरणार आहे.

**स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागातून मिळालेले भारताचे स्वातंत्र्य आता सामर्थ्य, आत्मविश्वास आणि विकासाच्या नव्या पर्वात दिमाखाने वाटचाल करीत आहे. यंदाच्या १५ ऑगस्टला भारत आपला ८०वा स्वातंत्र्यदिन साजरा करीत आहे. १९४७ साली याच दिवशी मिळालेल्या स्वातंत्र्याला यंदा ७९ वर्षे पूर्ण होत असताना, हा दिवस इतिहासाचे स्मरण करण्यासोबतच भारताच्या पुढील वाटचालीचा संकल्प करण्याचा दिवस आहे. 'वंदे मातरम' गीताची दीडशे वर्षे आणि '२०४७ पर्यंत विकसित भारत बनवण्याच्या उद्दिष्टात तरुण भारतीयांचे योगदान' यावर या वर्षीचा स्वातंत्र्यदिन सोहळा केंद्रित असणार आहे. एका बाजूला स्वातंत्र्यलढ्याच्या प्रेरणेचा वारसा आणि दुसऱ्या बाजूला नव्या भारताची युवा ऊर्जा. तरुणाईमध्येच विकसित भारताचे स्वप्न साकारण्याची सर्वाधिक क्षमता आहे हे देश जाणतो. भारतीय युवक आज विज्ञान, तंत्रज्ञान, नवउद्योजकता, क्रीडा, अंतराळ आदी क्षेत्रांत स्वतःला सिद्ध करीत आहेत. तर स्वातंत्र्यलढ्यात लाखो भारतीयांना प्रेरणा देणारे 'वंदे मातरम्' हे राष्ट्रीय गीत यंदा प्रथमच स्वातंत्र्यदिन सोहळ्याचा भाग म्हणून गायले जाणार आहे. या गीताच्या दीडशे वर्षांच्या गौरवशाली प्रवासाचे स्मरण यंदाच्या स्वातंत्र्यदिनी केले जाणार आहे. यंदाच्या स्वातंत्र्यदिनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेला 'हर घर तिरंगा, हर मन तिरंगा' हा संदेश. प्रत्येक घरावर तिरंगा फडकवावा, स्वातंत्र्यवीरांना आदरांजली वाहावी आणि विकसित भारताच्या निर्मितीचा संकल्प करावा असे आवाहन पंतप्रधानांनी केले आहे. घराघरांत फडकणारा तिरंगा म्हणजे देशाच्या सार्वभौमत्वाबद्दलचा अभिमान आणि राष्ट्रनिर्मितीतील प्रत्येक नागरिकाच्या सहभागाची जाणीव आहे. नव्या आत्मविश्वासाने पुढे जाणारा भारत आज जागतिक अंतराळ अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा भागीदार बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे. भारताच्या वाढत्या क्षमतेची दखल घेत नासाने इस्रोला आपल्या मून बेस प्रोग्रॅममध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण दिले आहे. भारतासाठी ही केवळ प्रतिष्ठेची बाब नसून भविष्यातील संशोधन आणि मानवाच्या अंतराळ मोहिमांमध्ये भारताची भूमिका अधिक व्यापक होण्याची संधी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या '२०४७ चा विकसित भारत' या संकल्पनेत भारताला स्वावलंबी, समृद्ध, आधुनिक आणि आत्मविश्वासपूर्ण राष्ट्र बनविण्याचे दूरदर्शी लक्ष्य आहे. २०४७ मध्ये स्वातंत्र्याची शताब्दी साजरी करताना भारताने जगातील अग्रगण्य राष्ट्रांमध्ये दिमाखाने उभे राहावे ही आकांक्षा आजच्या पिढीसमोरची मोठी जबाबदारी आहे. अर्थातच राष्ट्राची प्रगती ही केवळ सरकारची जबाबदारी असू शकत नाही. कायद्याचा आदर, करप्रामाणिकपणा, पर्यावरणसंवर्धन, महिला सन्मान, सामाजिक सलोखा आणि कर्तव्यभावना आदी मूल्यांमधूनच विकसित भारत घडणार आहे. त्यासाठी 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास' ही भावना तमाम भारतीयांनी प्रत्यक्ष जीवनात उतरवणे आवश्यक आहे. विकासाच्या वाटेवर पुढे जाताना स्वाभाविकच आपल्याला शहरी-ग्रामीण अशा सर्व भारतीयांना सोबत घ्यायचे आहे. कितीतरी योजनांमधून आज ग्रामीण भारतातील जीवनमान बदलण्याचे प्रयत्न वेग घेत आहेत. त्यामुळेच तिरंगा फडकवताना तसेच 'भारत माता की जय' म्हणताना आज 'माझे माझ्या भारत देशासाठी योगदान काय?' हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे. तमाम भारतीयांच्या सामूहिक प्रयासांतून नव्या भारताच्या पुढील वाटचालीला बळ मिळो हीच स्वातंत्र्यदिनाची मंगल कामना!**

# अलिबागमध्ये आता वाहतुकीला लागणार शिस्त





**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

अलिबाग हे रायगड जिल्ह्याचे राजधानीचे शहर तसेच पर्यटनस्थळ आहे. या शहरात दररोज हजारो लोक आपल्या कामानिमित्त येत असतात. त्यामुळे शहरात वाहतूक कोंडी होत असते. त्यावर अनेकवेळा चर्चा होते. उपाययोजना सुचविल्या जातात, परंतु अंमबजावणी होत नाही. वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी तसेच वाहतुकीला शिस्त लागण्यसाठी अलिबाग नगरपरिषदेने वाहतूक आराखडा तयार केला होता. जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी या वाहतूक आराखड्याला हिरवा कंदील दिला आहे. नगरपरिषदेने शहरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी तयार केलेल्या आराखड्यात तब्बल ४२ रस्ते व मार्गांवर विविध प्रकारच्या वाहतूक व्यवस्था प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार काही रस्त्यांवर सम-विषम पार्किंग, काही ठिकाणी पूर्णपणे नो-पार्किंग, तर काही मार्गांवर पे अँड पार्कची सुविधा राहणार आहे. तसेच आवश्यक ठिकाणी हॉकर्स झोन, वन-वे आणि अधिकृत रिक्षा थांबे निश्चित करण्यात आले आहेत. वाहतूक आराखड्याला मंजुरी मिळाली असली तरी त्याची अंमलबजावणी कशी होते यावर सारे अवलंबून राहणार आहे.

**सम-विषम पार्किंग**

स्टेट बँक ऑफ इंडिया ते श्री. एस. एन. जोशी यांच्या बंगल्यापर्यंतचा रस्ता, स्टेट बँक ऑफ इंडिया ते अलिबाग अर्बन बँक, द्वारका हॉटेल ते डोंगर हॉल, पशुवैद्यकीय दवाखाना ते श्री. जोग यांच्या घरापर्यंतचा रस्ता, ब्राह्मणआळी राम मंदिर ते के. यू. एस. मुख्य कार्यालयीन इमारत, युनियन बँक ते सार्वजनिक वाचनालय, महावीर चौक ते बालाजी नाका, बालाजी नाका ते गावडे ऑप्टिक्स, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते टिळक नाका, टिळक नाका ते अलिबाग नगरपरिषद कार्यालय आणि शेतकरी भवन ते अशोका सेंटर या मार्गांवर सम-विषम पार्किंग व्यवस्था राहणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जामा मशीद तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक ते महावीर चौक या मार्गांवर हॉकर्स झोन निश्चित करण्यात आला आहे. अलिबाग बीच पाणपोयीपासून हॉटेल सी-व्ह्यूपर्यंत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते महावीर चौक या मार्गांवर नो-हॉकर्स झोन राहणार आहे. तहसीलदार कार्यालय ते स्टेट बँक ऑफ इंडिया या रस्त्याच्या उजव्या बाजूस, डोंगर हॉल ते सिव्हिल हॉस्पिटल या रस्त्याच्या उजव्या बाजूस आणि जिजामाता हॉस्पिटल ते सिद्धार्थ नगर या रस्त्याच्या उजव्या बाजूस पे-अँड-पार्कची व्यवस्था करण्यात येणार आहे.

**१९ रस्ते नो-पार्किंग**

गंगासागर सोसायटी ते जिल्हाधिकारी कार्यालय, ब्राह्मणआळी राम मंदिर ते महावीर चौक, जुनी नगरपरिषद कार्यालय ते सत्कार प्रेस-कामतआळी, मारुती नाका ते द्वारका हॉटेल, चेंढरे मारुती मंदिर ते डॉ. चांदोरकर यांचा दवाखाना, हिराकोट तलावाच्या कंपाउंडबाहेरील बाजू, जिल्हाधिकारी निवासस्थानाच्या बाहेरील बाजूचा रस्ता, पोस्ट ऑफिस ते जिल्हा परिषद कार्यालय या रस्त्याची डावी बाजू, क्रीडा भवन मैदान ते अलिबाग बीच कमानीपर्यंतचा रस्ता आणि विलास कपड्यांच्या दुकानापासून चेंढरे मारुती मंदिरापर्यंतचा रस्ता नो पार्किंग राहणार आहे. याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते महावीर चौक या मार्गाची डावी बाजू आणि महावीर चौक ते हॉटेल रमाकांत या मार्गाचाही नो पार्किंगमध्ये समावेश आहे.

**वन वे**

जिल्हाधिकारी निवासस्थान ते जिल्हाधिकारी कार्यालय आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप निवासस्थान ते जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय या दोन मार्गांवर वन वे व्यवस्था लागू करण्यात येणार आहे. अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य गेटपासून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य गेटपर्यंतच्या रस्त्याच्या डाव्या बाजूस, मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप निवासस्थानालगतच्या रस्त्याच्या उजव्या बाजूस आणि जिल्हा सैनिक बोर्ड कार्यालय ते जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय या रस्त्याच्या दोन्ही बाजूस पार्किंग करता येणार आहे. अलिबाग बीच पाणपोयीपासून हॉटेल सी-व्ह्यूपर्यंत दोन्ही बाजूस, छत्रपती शिवाजी महाराज चौकातील काशिविश्वेश्वर मंदिर ते सावंत ऑप्टिक्स इमारतीच्या बाजूस, गणेश भोजनालयाच्या बाजूस, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयापासून स्टेट बँक ऑफ इंडियापर्यंत दोन्ही बाजूस, श्री. जोग यांच्या घरापासून ब्राह्मणआळी राम मंदिरापर्यंत दोन्ही बाजूस, जिल्हा स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्रापासून चेंढरे मारुती मंदिरापर्यंत आणि हॉटेल रमाकांतपासून बी. के. एम. टॉकीजपर्यंत पार्किंगची व्यवस्था करण्यात येणार आहे.

**रिक्षांसाठीही निश्चित थांबे**

शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी अधिकृत रिक्षा थांबेही निश्चित करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ डाव्या बाजूस, जिल्हा न्यायालयाकडील अंतर्गत रस्त्याच्या डाव्या बाजूस, रामनाथ येथील कल्याण भवनकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूस, बी.व्ही.एम. टॉकीजपासून आर.डी.सी.सी. बँक, अलिबाग शाखेकडील अंतर्गत रस्त्यावर, मुख्य रस्त्यापासून पी.एन.पी. मच्छी मार्केटकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर तसेच श्री. नं. ३ मधील वासुदेव कॉम्प्लेक्सकडून हॉटेल लीलॅककडे जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या बाजूस रिक्षा थांबे निश्चित करण्यात आले आहेत. तसेच डी.आय.सी. कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ डाव्या बाजूस, चेंढरे अ.न.प. शाळा क्रमांक ५ ते कच्छी भवनकडे जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या बाजूस, शिलकर नाका ते मिरची गल्लीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या बाजूस, बाजारपेठेतील पापाभाई पठाण चौकाजवळ उजव्या बाजूस, जिल्हा रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ डाव्या बाजूस, अलिबाग बीचजवळील पोलीस चौकीलगत आणि अलिबाग बसस्थानकापासून महावीर चौकाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या उजव्या बाजूस रिक्षा थांबे निश्चित करण्यात आले आहेत. अधिकृत रिक्षा थांब्यांवर एकावेळी पाचपेक्षा अधिक रिक्षा लावता येणार नाहीत. रिक्षा उभ्या करताना रस्त्यावरील वाहतुकीस कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर प्रादेशिक परिवहन विभागाच्या नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे.

**मालवाहतुकीच्या वेळेलाही बंधने**

नव्या व्यवस्थेनुसार शासकीय कार्यालये, शासकीय इमारती तसेच खासगी इमारतींच्या प्रवेशद्वारासमोरील जागा पार्किंगसाठी सोडावी लागणार आहे. तसेच शहरात सकाळी ९ ते दुपारी २ आणि सायंकाळी ४ ते रात्री ८.३० या वेळेत अवजड वाहनांद्वारे मालवाहतूक करणे अथवा माल उतरविण्यास बंदी राहणार आहे. नगरपरिषदेकडून संबंधित ठिकाणी पार्किंग, नो पार्किंग, वन वे, हॉकर्स झोन आदींच्या पाट्या लावण्याबरोबरच रस्त्यावर आवश्यक पट्टे मारण्यात येणार आहेत. जिल्हा वाहतूक विभागाने तयार केलेल्या अधिसूचनेला मंजुरी मिळाल्यानंतर शहरात वाहतूक नियमांची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होणार आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# पृथ्वी ते ताऱ्यांपर्यंतची आश्चर्यकारक झेप

माणसाला नेहमीच आकाशात काय आहे हे जाणून घ्यायची ओढ लागली आहे. रात्रीच्या आकाशात चमकणारे तारे पाहून प्राचीन काळापासून ऋषीमुनींनी ग्रह-ताऱ्यांच्या हालचालींचा अभ्यास केला. पण ती केवळ निरीक्षणाची पातळी होती. खऱ्या अर्थाने अंतराळ संशोधनाला सुरुवात झाली ती १९५७ मध्ये, जेव्हा सोव्हिएत रशियाने 'स्पुटनिक-१' हा पहिला कृत्रिम उपग्रह अवकाशात पाठवला. त्यानंतर माणसाने मागे वळून पाहिलेलं नाही. अंतराळ संशोधन म्हणजे पृथ्वीच्या पलीकडचं जग समजून घेण्याचा प्रयत्न. यात उपग्रह सोडणं,



चंद्रावर आणि मंगळावर यान पाठवणं, ताऱ्यांचा अभ्यास करणं, आकाशगंगेची रचना समजून घेणं या सगळ्यांचा समावेश होतो. भारतासाठी या क्षेत्रातली मोठी झेप होती २००८ मध्ये 'चांद्रयान-१' चं यश. या मोहिमेतून चंद्राच्या पृष्ठभागावर पाण्याचे अंश सापडले. त्यामुळे जगभरातल्या शास्त्रज्ञांचं लक्ष भारताकडे वेधलं गेलं. त्यानंतर २०१३ मध्ये 'मंगलयान' अर्थात 'मार्स ऑर्बिटर मिशन' यशस्वी झालं. सर्वात कमी खर्चात मंगळाच्या कक्षेत यान पोहोचवणारा भारत पहिला देश ठरला. २०२३ मध्ये 'चांद्रयान-३' ने चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ यशस्वी लँडिंग करून इतिहास घडवला. ही कामगिरी करणारा भारत जगातला चौथा देश ठरला. अंतराळ संशोधनाचा फायदा फक्त शास्त्रापुरता मर्यादित नाही. आज आपण वापरत असले हवामान अंदाज, जीपीएस नेव्हिगेशन, दूरसंचार, आपत्ती व्यवस्थापन हे सगळं उपग्रहांच्या मदतीने चालतं. शेतकऱ्याला पिकाचा अंदाज, मच्छीमाराला समुद्रात मासे कुठे आहेत याची माहिती, पूर आणि वादळाची पूर्वसूचना हे सगळं अंतराळ तंत्रज्ञानामुळे शक्य झालं आहे. इस्रोच्या यशामागे एक महत्त्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे कमी खर्चात मोठं काम करणं. पाश्चात्य देशांच्या तुलनेत भारताची अंतराळ मोहीम १० पटीने स्वस्त आहे. यामुळेच जगभरातले देश भारताकडून उपग्रह सोडून घेत आहेत, पण अंतराळ संशोधनात आव्हानेही कमी नाहीत. अंतराळात जाणं धोकादायक आहे. रॉकेट फेल होणं, यानाचं नियंत्रण सुटणं, अंतराळातील कचरा वाढणं हे मोठे प्रश्न आहेत. पृथ्वीभोवती हजारो मृत उपग्रह आणि त्यांचे तुकडे फिरत आहेत. त्यामुळे भविष्यातील मोहिमांसाठी धोका वाढत आहे. अंतराळ संशोधन म्हणजे माणसाची मर्यादा ओलांडण्याची जिद्द आहे. पृथ्वीवर प्रश्न संपले नाहीत, पण ताऱ्यांकडे पाहणं माणसानं सोडलं नाही. कारण तिथेच पुढच्या पिढीचं भविष्य दडलेलं आहे.

# भारतीय स्वातंत्र्य दिन चिरायू होवो!

माझ्या प्रिय भारतीयांनो, आपणास स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा! भारताला स्वातंत्र्य मिळून ७९ वर्षे पूर्ण झाली असून, आपण आज स्वातंत्र्याचा ८०वा वर्धापन दिन साजरा करत आहोत. भारतीय स्वातंत्र्य चिरायू होवो! भारतभूमीची ब्रिटिश राजवटीतून मुक्तता करण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी प्राणांची आहुती दिली, तर काहींनी बहुमूल्य योगदान दिले. त्या सर्व शूरवीरांच्या बलिदानाची आठवण करून देणारा हा दिवस आहे. कृतज्ञतेच्या भावनेतून आज आपण त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करीत आहोत.१५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि १५० वर्षांच्या गुलामगिरीतून भारत मुक्त झाला. हा दिवस भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरात लिहिला गेला. हा आपला राष्ट्रीय सण असून समस्त भारतीय हा दिवस मोठ्या आनंदात व उत्साहात साजरा करत आहेत. पारतंत्र्याचा काळोख नाहीसा होऊन भारत मातेच्या उदरातून स्वराज्याचा उषःकाल उदयास आला. परमपूज्य भारत मातेला त्रिवार वंदन!स्वातंत्र्यप्राप्तीसाठी शेकडो क्रांतिवीरांनी बलिदान दिले. त्यामुळेच आज आपण स्वातंत्र्याचा मोकळा श्वास घेत आहोत. १५ ऑगस्ट हा क्रांतिकारकांच्या आठवणींना उजाळा देणारा दिवस



**निमित्त**

आहे. चला, एकसुराने म्हणूया... जय हिंद!राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली कस्तुरबा गांधी, मोतीलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद, सरोजिनी नायडू, वल्लभाई पटेल, जयप्रकाश नारायण, विनोबा भावे, यशवंतराव चव्हाण, बाबू गेणू, दत्ताजी ताम्हणे, शिरीषकुमार मेहता आदी स्वातंत्र्यसेनानींनी अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने लढा देऊन ब्रिटिशांना 'भारत छोडो'चा इशारा दिला. दुसऱ्या बाजूने लोकमान्य टिळक, भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, चंद्रशेखर आझाद, सुभाषचंद्र बोस, लाला लजपतराय, स्वातंत्र्यवीर सावरकर, नाना पाटील, सेनापती बापट, चाफेकर बंधू, उमाजी नाईक आदी जहाल क्रांतिकारकांनी गोळीला गोळीने उत्तर दिले. दोन्ही देशभक्त गटांच्या संयुक्त प्रयत्नांतून भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. सर्व महान क्रांतिकारकांना मानाचा मुजरा! भारत माता की जय! वंदे मातरम्!पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'हर घर तिरंगा' अभियान राबविले जात आहे. देशाची एकात्मता, अखंडता आणि राष्ट्रप्रेम वाढविणे हा त्याचा उद्देश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही नागरिकांना घरोघरी तिरंगा फडकविण्याचे आवाहन केले आहे. स्वराज्याचे सुराज्यात परिवर्तन करण्यासाठी मोदी सरकारने शेतकरी, कामगार, महिला, युवकांसाठी ठोस योजना राबविल्या. कर्जमाफी, प्रधानमंत्री मुद्रा योजना, मेक इन इंडिया, स्टार्ट अप यामुळे देश प्रगतीपथावर आहे. मोदींच्या नेतृत्वामुळे भारत जगात विकसित देशांच्या पंगतीत बसला आहे. क्रांतिकारकांच्या बलिदानाने मिळालेले स्वातंत्र्य अधिक मजबूत करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा. तेव्हाच स्वातंत्र्य दिन साजरा करणे सार्थक होईल. भारतीय स्वातंत्र्य दिन चिरायू होवो!

**-रणवीर राजपूत, ठाणे/नंदुरबार**
**गव्हर्नमेंट मीडिया, महाराष्ट्र शासन**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# चाळीशीनंतरचा आहार : शरीराला हवी नवी काळजी

चाळीशी ओलांडली की शरीरात हळूहळू बदल व्हायला लागतात. चयापचयाचा वेग कमी होतो, स्नायूंची झीज सुरू होते, हाडं ठिसूळ होतात आणि रोगप्रतिकारशक्तीही थोडी मंदावते. त्यामुळे वयाच्या २०-३० मधला आहार चाळीशीनंतर चालत नाही. शरीराला आता इंधन कमी पण पोषण जास्त हवं असतं. योग्य आहार हाच निरोगी वृद्धापकाळाचा पाया आहे. चाळीशीनंतर स्नायूंची झीज नैसर्गिकपणे सुरू होते. त्याला 'सार्कोपेनिया' म्हणतात. यासाठी आहारात पुरेसे प्रथिने असणं गरजेचं आहे. डाळी, मूग, चणा, सोयाबीन, अंडी,



मासे, दही, पनीर यांचा रोजच्या आहारात समावेश करा. दररोज शरीराच्या वजनाच्या प्रत्येक किलोला १ ग्रॅम प्रथिनं मिळतील असं नियोजन करा. प्रथिनं स्नायू टिकवतात आणि चयापचयाचा वेग राखतात. हाडं ठिसूळ होण्याची समस्या महिलांमध्ये रजोनिवृत्तीनंतर आणि पुरुषांमध्ये ५० नंतर वाढते. म्हणून आहारात दूध, दही, ताक, तीळ, राजगिरा, पालेभाज्या असाव्यात. सकाळी १५-२० मिनिटं उन्हात बसल्याने शरीराला व्हिटॅमिन डी मिळतं. गरज पडल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने पूरक आहार घ्या. चाळीशीनंतर इन्सुलिनचा प्रतिकार वाढतो. त्यामुळे मधुमेहाचा धोका वाढतो. गोड पदार्थ, पांढरा साखर, मैदा, तळले, पॅकबंद पदार्थ कमी करा. त्याऐवजी संपूर्ण धान्य, बाजरी, ज्वारी, नाचणी यांचा वापर करा. या धान्यात फायबर जास्त असतं. त्यामुळे पोट भरतं आणि साखर हळूहळू वाढते. सगळे चरबी वाईट नसतात. बदाम, अक्रोड, अळशीचे बी, चिया सीड्स, ऑलिव्ह ऑइल, तूप यातले चांगले चरबी हृदयासाठी उपयुक्त आहेत. हे कोलेस्ट्रॉल नियंत्रित करतात आणि मेंदूचं कार्य सुधारतात. पण प्रमाण मर्यादित ठेवणं महत्त्वाचं आहे. वयानुसार पचनक्रिया मंदावते आणि बद्धकोष्ठतेचा त्रास वाढतो. यासाठी रोज २.५ ते ३ लिटर पाणी प्या. आहारात फळं, भाज्या, सलाड, ओट्स, इडली-उप्पिट सारखे फायबरयुक्त पदार्थ ठेवा. फायबर पोट साफ ठेवतो आणि कोलेस्ट्रॉलही कमी करतो. उच्च रक्तदाब ही चाळीशीनंतरची सामान्य समस्या आहे. त्यासाठी बाहेरचं खाणं, पॅकबंद सूप, लोणचं, पापड यातलं मीठ कमी करा. घरचं कमी मीठाचं जेवण हेच सुरक्षित आहे. एकाच वेळी भरपूर खाण्याऐवजी दिवसातून ४-५ वेळा थोडं थोडं खा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कधीही सकाळचा नाश्ता चुकवू नका.

# पुणे-माणगाव महामार्ग हलक्या वाहनांसाठी खुला!

## अवजड वाहनांना बंदी कायम



**माणगाव : प्रतिनिधी**

पुणे-मालेगाव ते पुणे-रायगड जिल्हा हद्द आणि पुढे माणगावकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ एफच्या रुंदीकरण व मजबुतीकरणाच्या कामासाठी बंद ठेवण्यात आलेला महामार्ग आता मर्यादित स्वरूपात वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. या मार्गावर केवळ हलकी मोटार वाहने आणि शासकीय प्रवासी वाहनांना ताशी २० किलोमीटर वेगमर्यादेसह वाहतूक करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

पुणे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डुडी यांनी याबाबत आदेश जारी केला आहे.राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३एफच्या रुंदीकरण आणि मजबुतीकरणाचे काम सुरू असल्याने यापूर्वी या मार्गावरील वाहतूक बंद करून पर्यायी मार्गाने वळविण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, मार्गावरील सद्यस्थितीचा आढावा घेतल्यानंतर मर्यादित स्वरूपात वाहतूक सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता, पुणे यांनी ८ ऑगस्ट २०२६ रोजी महसूल विभाग, पोलीस विभाग, संबंधित ठेकेदार आणि प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसमवेत महामार्गाची संयुक्त पाहणी केली. या पाहणीदरम्यान रस्त्याची सद्यस्थिती, सुरू असलेली कामे आणि वाहतुकीची सुरक्षितता यांचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३एफवरील वाहतूक केवळ हलक्या मोटार वाहनांसाठी आणि शासकीय प्रवासी वाहनांसाठी ताशी २० किलोमीटर वेगमर्यादेसह खुली करण्याची शिफारस करण्यात आली.

यासोबतच उपविभागीय अधिकारी, मावळमुळशी, पुणे यांनीही या मार्गावरील वाहतूक खुली करण्याची शिफारस केली होती. संबंधित विभागांच्या पाहणी अहवालांचा आणि शिफारशींचा विचार करून जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी हा निर्णय घेतला. मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम ११५ तसेच शासनाच्या गृह विभागाने १९ मे १९९० रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून हा आदेश काढण्यात आला आहे.

त्यामुळे पुणे-मालेगाव, पुणे-रायगड जिल्हा हद्द माणगाव या मार्गावर आता हलक्या वाहनांची वाहतूक सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, महामार्गाचे रुंदीकरण व मजबुतीकरणाचे काम अद्याप सुरू असल्याने वाहनचालकांनी प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. विशेषतः ताशी २० किलोमीटरची वेगमर्यादा पाळणे आणि काम सुरू असलेल्या ठिकाणी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. या आदेशानुसार सर्व प्रकारच्या वाहनांना मुक्त वाहतुकीची परवानगी मिळालेली नसून, सध्या केवळ हलकी मोटार वाहने आणि शासकीय प्रवासी वाहनांनाच परवानगी देण्यात आली आहे. अवजड वाहनांसाठी बंदी कायम राहणार आहे. यामुळे पुणे जिल्ह्यातून रायगडकडे माणगावच्या दिशेने प्रवास करणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळणार आहे. दरम्यान, आता महामार्गाच्या कामामुळे पर्यायी मार्गाचा वापर करावा लागत असल्याने वाहनचालकांना होणारा अतिरिक्त वेळ आणि वाहतूक कोंडीचा त्रास काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे.

महामार्गाचे रुंदीकरण व मजबुतीकरणाचे काम सुरक्षित आणि वेगाने पूर्ण करण्यासाठी प्रशासन, पोलीस विभाग, संबंधित यंत्रणा आणि वाहनचालकांनी परस्पर समन्वय ठेवणे आवश्यक आहे.


## माथेरान गिरीस्थान नगरपरिषद

माथेरान, ता. कर्जत, जिल्हा- रायगड, ४१० १०२, ई-मेल आयडी: mcomatheran@gmail.com

जावक क्र. : मागिनप १४४२/२०२६-२७ | दिनांक : १३/०८/२०२६

**निविदा सुचना सन २०२६-२७**

**फेर निविदा सूचना - १**

माथेरान गिरीस्थान नगरपरिषद कार्यालयाकरीता खालील कामाकरिता शासकीय किवा नोंदणीकृत अ- शासकीय प्रवठादार यांचेकडून सिलबंद निविदा दर मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाचा कालावधी |
|---|---|---|
| १. | नगरपरिषद कार्यालयासाठी विविध राष्ट्रीय कार्यक्रम/स्थानिक कार्यक्रमासाठी मंडप /पेंडॉल, साउंड सिस्टीम, लायटिंग, खुर्च्या, टेबल इत्यादी साहित्य सेवा पुरविणे बाबत. | १ वर्ष |
| २. | नगरपरिषद कार्यालयासाठी चहा, नाश्ता, जेवण इत्यादी पुरवठा करणे बाबत. | १ वर्ष |
| ३. | नगरपरिषद कार्यालयात आस्थापना विभागासाठी ऑफलाईनसंगणक प्रणाली पुरवठा करणे बाबत. | १ वर्ष |
| ४. | नगरपरिषद कार्यालयासाठी स्टेशनरी, छपाई साहित्य पुरवठा करणे बाबत. | १ वर्ष |
| ५. | नगरपरिषद कार्यालयासाठी खेळण्याचे विविध साहित्य पुरवठा करणे बाबत. | १ वर्ष |

**अटी : शर्ती**

१. कोरे निविदा पत्रक विक्रीची किंमत रक्कम रुपये ५००/- ना परतावा नगरपरिषद कार्यालयात रोखीने भरून सुट्टीचे दिवस वगळता दिनांक. १७/०८/२०२६ ते २५/०८/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेत संबंधीत विभागात, आपल्या संस्थेच्या लेटरहेडवर मागणी अर्ज केल्यानंतर उपलब्ध होतील.

२. निविदे बाबत अनामत रक्कम रुपये ५०००/- डी.डी. द्वारे स्विकारण्यात येईल. निविदेसोबत अनामत रक्कम भरल्याचा डी.डी. जोडणे अवश्यक आहे.

३. सिलबंद निविदा स्वीकारण्याचा अंतिम दिनांक. २५/०८/२०२५ रोजी ५.०० वाजेपर्यंत असून, शक्य झाल्यास सिलबंद निविदा त्याच दिवशी सायंकाळी ५.०० वाजता अथवा नगरपरिषदेच्या सोयीनुसार मा. मुख्याधिकारी यांच्या दालनात हजर असलेले निविदाधारक किवा प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

४. प्रत्येक कामाचा निविदेचा लिफाफा क्र. १. व लिफाफा क्र. २ असे राहतील. तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र. १ मध्ये अ) अनामत रक्कम भरल्याचा डी.डी. ब) नोंदणी प्रमाणपत्र व निविदे फॉर्म सोबत असलेले सर्व परिशिष्ट भरून जोडणे आवश्यक आहे. क) संविदेमध्ये पदाधिकाऱ्याचा सहभाग नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र. ड) पुरवठाधारक अधिकृत असल्याचे इत्यादी प्रमाणपत्र सादर करावेत. तसेच लिफाफा क्र. २ मध्ये पुर्ण भरलेली वित्तीय निविदा असेल.

५. लिफाफा क्र. १ उघडून छाननीअंती त्यातील तांत्रिक कागदपत्रे योग्य असल्यास वित्तीय बोलीचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल. कागदपत्र लिफाफा सिलबंद करण्यात यावा.

६. निविदापत्रके पोस्टाने पाठविल्यास स्वीकारली जाणार नाहीत. मंजूर पुरवठा धारकास आवश्यक त्या स्टॅम पेपरवर नगरपरिषदेच्या अटी-शर्ती नुसार करारनामा करून द्यावा लागेल.

७. प्राप्त निविदापैकी कोणतीही १ निविदा स्विकारण्याची अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखन ठेवलेला आहे. त्याची कारणे दिले जाणार नाहीत.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**माथेरान गिरीस्थान नगरपरिषद करीता**


## कर्जतमध्ये भजनभूषण गजाननबुवा पाटील यांचा गुरुपौर्णिमा सोहळा उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

भजनभूषण कै. गजाननबुवा पाटील स्मारक समितीच्या वतीने भजनभूषण कै. गजाननबुवा पाटील यांचा ५वा गुरुपौर्णिमा समारंभ मोठ्या भक्तिभावात संपन्न झाला. यावेळी बुवांच्या शिष्यांनी भजन सेवा सादर करून त्यांना आदरांजली वाहिली. अलिबाग, पेण, बदलापूर, पनवेल आदी भागांतून बुवांचे शिष्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कर्जतमधील प्रतिआळंदी-पंढरपूर परिसरात असलेल्या स्मारक समितीच्या सभागृहात सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी गणपतबुवा म्हात्रे यांनी पंचपदी सादर केली. स्मारक समितीचे अध्यक्ष दीपकबुवा करोडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून तसेच कै. गजाननबुवा पाटील यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून समारंभाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी वसंत पाटील, प्रसाद पाटील, शेखर कानडे, सुचिता वांजळे, शैलजा विशे, संगीता पवार, रंभाजीबुवा थोरवे, सूर्याजी ठाणगे, सुरेश भोईर, सुनील देशमुख, रवींद्र लाड, अशोक थोरवे उपस्थित होते.



उपस्थितांनी बुवांना आदरांजली वाहिली. कार्यक्रमात बल्लाळ जोशी यांनी बुवांच्या आठवणींना उजाळा दिला. श्रीधर काकडे, पावनी पाटील, रुद्र भंडारी, रुपेश पाटील, ज्ञानेश्वरबुवा म्हात्रे, नारायणबुवा, पेडणेकरबुवा, विलासबुवा मनोरे-पेण, भालचंद्रबुवा विशे, उल्हास कासार, बाळुबुवा जयवंत पाटील, महेश पाटील, प्रवीण थोरवे, प्रल्हाद शिंदे, नील तुपे यांनी भजनसेवा सादर केली. शेखर रानडे, ज्ञानेश्वरबुवा खरे, छगनबुवा निमणे, आकाश काटे, सिद्धांत पाटील, विघ्नेश पाटील यांनी पखवाजाची तर धनंजय बेडेकर, महेश लघाटे, सुनील पालांडे, राजवर्धन देशमुख, वैष्णव पाटील यांनी तबला साथ केली.

या सोहळ्याला आमदार महेंद्र थोरवे, मनोहर थोरवे, नगराध्यक्षा पुष्पाताई दगडे, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, नगरसेवक संकेत भासे, प्रशांत पाटील, महेंद्र चंदन, रोहित ओसवाल, माजी नगराध्यक्षा वनिता म्हसे, लीला चंदन, मीरा म्हसे, प्राची पाटील, दिनेश कडू, अक्षय जोशी, मोहन पाटील, कैलास पाटील, चिंतामणी पाटील, श्रीराम पाटील, तानाजी वांजळे, दिगंबर कांबळे, अशोक शिंदे, कौशिक वांजळे, प्रसन्न पाटील, जयेश शेलार, सारिका हनुमंते, नीता देशमुख आदी उपस्थित होते.

## मोर्बा मॉर्डन स्कूलची हर घर तिरंगा रॅली

**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या वर्धापनदिनानिमित्त तालुक्यातील मोर्बा मॉर्डन इंग्लिश स्कूलच्या वतीने "हर घर तिरंगा" कार्यक्रमांतर्गत शुक्रवारी (दि. १४) मोर्बा गावातून उत्साहात रॅली काढण्यात आली. "भारत माता की जय", "वंदे मातरम", "स्वतंत्र भारताचा विजय असो" या विद्यार्थ्यांच्या घोषणांनी मोर्बा शहर दुमदुमून गेले.

मोर्बा शहरातून शुक्रवारी सकाळी ही रॅली काढण्यात आली. या रॅलीत शाळेचे विद्यार्थी, मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारीवृंद मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा घेऊन देशभक्तीपर गीतांसह संपूर्ण गावातून फेरी मारली. "हर घर तिरंगा" या राष्ट्रीय मोहिमेला नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्वातंत्र्याच्या ७९व्या वर्धापनदिनाच्या पूर्वसंध्येला शाळेतील विद्यार्थ्यांनी घेतलेल्या या उपक्रमाचे गावकऱ्यांकडून कौतुक करण्यात आले.





## जाहीर नोटीस

**उप विभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात**

On Admission आरटीएस अपिल क्र........../२०२५

कै. पुष्पा चंदर उर्फ चंद्रकांत पवार (लग्नापुर्वीची)
उर्फ पुष्पा बाळकृष्ण पाटील (लग्नानंतरचे नाव) (मयत तर्फे वारस) ........ वादी
श्री. प्रदीप बाळकृष्ण पाटील, रा. मु.पो. चिखले, ता. पनवेल, जि. रायगड

**विरुध्द**

कै. चंद्रकांत बेंडू पवार (मयत तर्फे वारस)
के. लक्ष्मी चंद्रकांत पवार (मयत तर्फे वारस)
१. रमेश चंद्रकांत पवार, २. सुरेश चंद्रकांत पवार, ३. जनाबाई अनंत भोपी अ.नं. १ ते ३ रा. मु. पो. शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२२१
४. मीना संपत सनगर, रा. मु.पो. चिरनेर, रामाचा पाडा, ता. उरण, जि. रायगड ४१०२०६
कै. ताईबाई चंद्रकांत पवार (मयत पत्नी वारस)
५. संजय चंद्रकांत पवार, ६. राजेश चंद्रकांत पवार
७. नंदा राम म्हात्रे, रा. मु. पो. बेलापूर गाव, कोळीवाडा, राम मंदिराजवळ, सेक्टर २०, ता.जि. ठाणे ४००६१४
८. जयश्री वासुदेव कर्णेकर, ९. कुमुदिनी महादेव मुकादम
अनु नं. ५, ६, ८ व ९ सर्व रा. मु.पो. शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२२१
कै. चंद्रभागा चंद्रकांत पवार (मयत पत्नी वारस)
१०. ताराबाई रामचंद्र पाटील,
रा. मु. सारसोले गाव, खंडोबा मंदिर, सेक्टर ६. कुलस्वामिनी अपार्टमेंट जवळ, नेरुळ, नवी मुंबई, ता. जि.ठाणे ४००७०६
११. अरुणा मारुती ठोंबरे (मयत पत्नी वारस)
११.१. ताराबाई रामचंद्र पाटील
रा. मु. सारसोले गाव, खंडोबा मंदिर, सेक्टर ६, कुलस्वामिनी अपार्टमेंट जवळ, नेरुळ, नवी मुंबई, ता. जि. ठाणे ४००७०६
११.२. धनश्री धनाजी कोंडीलकर, रा. मु. जांभिवली, पो. आपटा, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०७
११.३. राजेश्री राजेश पाटील,
रा. मु. वडवली, पो. पळस्पे, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२२१ . .........प्रतिवादी

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीव्दारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड येथिल फेरफार नोंद क्र. ३३०४ दि. १३/०९/१९९८ चे विरुध्द अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तूतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यांत आलेल्या आहेत प्रस्तूत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दिनांक ०३/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीव्दारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमिन मिळकतीशी संबधित असलेल्या व्यक्तीनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यकत्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे- शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| ९५ | १ | ०.७८.९० | १६.२५ |
| ३९८ | १ | ०.०८.०० | ०.२२ |
| १ | ३ | ०.३८.२० | ८.४४ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

**ठिकाण :- पनवेल.**
**दिनांक :- १३/०८/२०२६**

**सही/-**
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**


## निर्लेखित शासकीय वाहन खरेदीसाठी निविदा सादर करण्याचे आवाहन

**रायगड-अलिबाग : जिमाका**

अलिबाग येथील प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांच्यासाठी वापरात असलेले कॉरोला ऑल्टिस १.८ हे शासकीय वाहन क्रमांक एमएच-०१/एएन/०७० दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजी निर्लेखित करण्यात आले आहे. सदर वाहन अधिक किंमत देऊन खरेदी करू इच्छिणाऱ्या व्यक्तींनी दि. २२ ऑगस्टपर्यंत मोहोरबंद किंमतीच्या निविदा सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, सदर वाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांच्या न्यायालयाच्या आवारात पाहणीसाठी उपलब्ध ठेवण्यात आले आहे. सर्व इच्छुक असणाऱ्यांना कार्यालयीन वेळेत वाहनाची पाहणी करता येईल.

## सुवर्णक्रांती मल्टिस्टेट लिमिटेडच्या वर्धापनदिनानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन

**माणगाव : प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रातील अग्रगण्य सुवर्णक्रांती अर्बन मल्टिस्टेट निधी लिमिटेडच्या माणगाव शाखेचा तृतीय वर्धापनदीन सोहळा शनिवार दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता संस्थेचे संस्थापक सुखदेव म्हात्रे आणि संचालक शीतल पंडागळे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. बँकेच्या या वर्धापन दिनानिमित्त प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत खरे हॉल, बामणोली रोड, माणगाव येथे सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला कल्याण-नेवाळी, डोंबिवली, उरण, नेरळ, कामोठे, नाशिक, पनवेल या शाखांमधील सर्व व्यवस्थापक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. तसेच संस्थेचे सर्व संचालक, सभासद, खातेदार, हितचिंतक, भागधारक, सर्व शाखांचे शाखाधिकारी, कर्मचारी यांनी सकाळी १० वाजता मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन माणगाव व महाड शाखेचे व्यवस्थापक राकेश पडवळ, मोर्बा-माणगाव शाखेचे विभागीय व्यवस्थापक संदीप सकपाळ, अक्षता मोरे, इंदापूर शाखेचे श्री. पोटले, बँक व्यवस्थापक लतिका मॅडम आणि बँकेचे सर्व वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांच्यासह माणगाव व महाड शाखेतर्फे करण्यात आले आहे.

सुवर्णक्रांती अर्बन मल्टिस्टेट निधी लिमिटेड या बँकेने अल्पावधीत नावलौकिक कमाविला आहे. "सहकारातून समृद्धीकडे" या बँकेची वाटचाल सुरू असून खातेदार आणि ठेवीदारांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बँक नेहमीच प्रयत्नशील राहिली आहे. वर्धापनदिन सोहळ्याचा एक भाग म्हणून सकाळी १० वाजता तीन तासांचे चर्चासत्र आणि प्रशिक्षण सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

सभेत तीन वर्षांत ज्या प्रतिनिधींनी आणि अधिकाऱ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे, त्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. याशिवाय बँकेच्या पुढील नियोजनाबत संस्थापक सुखदेव म्हात्रे उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती माणगाव व महाड शाखेचे व्यवस्थापक राकेश पडवळ यांनी दिली.


## दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल

**४७१ कापड बाजार, टिळक रोड, पनवेल**

**ताबा सूचना**

**(स्थावर मालमत्तेकरिता)**

**(सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट नियमन, २००२ नुसार)**

ज्याअर्थी,

**मी, श्री. अजय लक्ष्मण कुलकर्णी**, मुख्य कार्यकारी अधिकारी, दि पनवेल को-ऑप अर्बन बँक लि., बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अमंलबजावणी) नियमन २००२ च्या नियम ९ आणि कलम १३ (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून प्रत्येक खात्यासमोर नमूद केलेल्या दिनांकास मागणी सूचना जारी करून संबंधित कर्जदारा/रांकडे प्रत्येक खात्यासमोर उल्लेखिलेली रक्कम सूचनेच्या दिनांकापासून/ सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत परतावा करण्याची मागणी केली होती.

**कर्जदार सदर रकमेचा परतावा करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना सूचना देण्यात येते की,याखाली वर्णन केलेल्या मालमत्तेच्या निम्नस्वाक्षरीकार यांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमनाच्या** नियम ९ **सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून प्रत्येक खात्याच्या समोर उल्लेखिलेल्या दिनांकास ताबा घेतला आहे.**

विशेषतः कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे खबरदार करण्यात येते की, सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि या मालमत्ते/त्तांबाबत कोणताही व्यवहार हा दि पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.च्या रक्कम आणि त्यावरील व्याजाच्या प्रभारास अधीन असेल.

| अ. क्र. | कर्जदार/गहाणवटदार/ जामीनदाराचे नाव (मालमत्तेचे मालक) | गहाणवट मालमत्तेचे वर्णन | मागणी सूचनेचा दिनांक | ताबा सूचना चिटकवण्याचा दिनांक | मागणी सूचनेच्या दिनांकास थकबाकी रक्कम (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | कु. लता बाळाराम पाटील, श्री. संदीप भगवान मदने, श्री. मंगेश गंगाधर थले, श्री. प्रितेश तुकाराम डंगरकर | घर क्र. १३०, ग्राम पंचायत उसर्ली, गाव उसर्ली बुद्रुक, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, क्षेत्रफळ १०५०.७४ चौ.फू. (घर क्र. १३०) ४१०२०६. कु. लता बाळाराम पाटील | २९.०४.२०२६ | १३.०८.२०२६ (सांकेतिक) | दि. ३१.०३.२०२६ रोजीनुसार रु. ८,४२,४६७/- (रुपये आठ लाख बेचाळीस हजार चारशे सदुसष्ट मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.०४.२०२६ पासूनचे व्याज. |
| १ | श्री. मुकेश तुकाराम डंगरकर, श्री. संतोष कुमार पाणीग्रही श्री. नवनाथ रामचंद्र म्हसकर | मुकेश तुकाराम डंगरकर यांच्या नावे असलेले ग्राम पंचायत उसर्ली, घर क्र. ८-ए आणि ८-बी, क्षेत्रफळ ८०.८९ चौ. मी., तालुका पनवेल, जिल्हा रायगड - ४१०२०६. | २९.०४.२०२६ | १३.०८.२०२६ (सांकेतिक) | दि. ३१.०३.२०२६ रोजीनुसार रु. ६,२७,४९५/- (रुपये सहा लाख सत्तावीस हजार चारशे पंचाण्णव मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.०४.२०२६ पासूनचे व्याज. |

तारण मालमत्ता सोडविण्याकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदार / जामीनदार / गहाणवटदार यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

**दिनांकः १३.०८.२०२६**
**ठिकाणः पनवेल**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.**

# तिरंगा रॅलीतून राष्ट्रभक्तीचा संदेश

## नवी मुंबई महापालिका महापौर, उपमहापौरांची उपस्थिती

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र व राज्य शासनाच्या ‘घरोघरी तिरंगा अर्थात हर तिरंगा’ मोहीमेअंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आज महापौर सुजाता पाटील व उपमहापौर दशरथ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत तिरंगा रॅली काढण्यात आली.

‘भारतमाता की जय’, ‘वंदे मातरम्’, ‘जय जवान जय किसान’ अशा घोषणा देत कुकशेत येथील नवी मुंबई महानगरपालिका इंग्रजी माध्यम शाळा क्र. १२१ मधील विद्यार्थी व त्यांचे पालक तसेच शिक्षक आणि नागरिक या तिरंगा रॅलीमध्ये उत्साहाने सहभागी झाले होते.

विशेष म्हणजे नमुंमपा पूर्वप्राथमिक शाळा क्र. ९२ मधील चिमुकल्यांनीही बोबड्या बोलात भारतमातेचा जयजयकार केला. महापौर व उपमहापौर महोदयांनी या लहानग्यांचे विशेष कौतुक केले. यावेळी ओलू, सुकू, घातकू हे ओला, सुका व घरगुती घातक कच–याची प्रतिकचिन्ह असलेले ३ शुभंकर (मॅस्कॉट) तिरंगा रॅलीचे आकर्षण होते.

याप्रसंगी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे, नेरूळ विभागाच्या सहा.आयुक्त अनुराधा बाबर, कार्यकारी अभियंता सचिन शिंदे, शिक्षणाधिकारी अशोक कडुस, मुख्य स्वच्छता अधिकारी राजुसिंह चव्हाण व नरेश अंधेर आणि इतर अधिकारी, कर्मचारी व स्वच्छताकर्मी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



हर घर तिरंगा मोहीमेंतर्गत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग कार्यालयांमार्फत तसेच शाळाशाळांमध्ये तिरंगा रॅलींचे आयोजन करण्यात येत असून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. घनकचरा व्यवस्थापन विभाग आणि आरोग्य विभाग यांच्या वतीने संयुक्तपणे ‘घरोघरी तिरंगा घरोघरी स्वच्छता घरोघरी आरोग्य’ असे अभियान विभागाविभागांमध्ये प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या सर्वच उपक्रमांना उत्साही जनसहभाग लाभत असून आजची नेरूळ विभागातील तिरंगा रॅलीही महापौर व उपमहापौर यांच्या प्रमुख उपस्थितीत देशभक्तीचा गजर करीत जल्लोषात संपन्न झाली.

# ऑनलाईन गेमिंगच्या नादात घातला सव्वा कोटींचा गंडा

## विंधणे येथील धाकटी जुई गावातील तरुणाची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील विंधणे येथील धाकटी जुई गावातील २६ वर्षीय वाणिज्य शाखेचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्याने ऑनलाईन गेमिंगच्या नादात तब्बल १ कोटी २७ लाख ३१ हजार २०२ रुपये गमावल्याची घटना समोर आली आहे.



याप्रकरणी तरुणाने नवी मुंबई सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी ‘खेलो२४मॅच’ या ऑनलाईन गेमिंग प्लॅटफॉर्मच्या संचालक, व्यवस्थापक, ग्राहक प्रतिनिधी तसेच या प्रकाराला सहकार्य करणाऱ्या संबंधितांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

धाकटा जुई राहणा–या तरूणाकडे वाहतूक व्यवसायासोबत जमीन विक्रीतून आलेली मोठी रक्कम होती. त्यामुळे ऑक्टोबर २०२४ ते जुलै २०२६ या कालावधीत हा तरुण ऑनलाईन गेमिंगच्या संपर्कात आला. संबंधित संकेतस्थळ नोंदणीकृत असल्याचा समज झाल्यानंतर त्याने त्यावर स्वतःची नोंदणी केली. संकेतस्थळावर तीनपत्ती, कॅसिनो आणि इतर ऑनलाईन गेम उपलब्ध असल्याचे त्याला दिसले.

गेमिंग कंपनीच्या ग्राहक प्रतिनिधीने केलेल्या मार्गदर्शनानुसार तरुणाने विविध व्यवहारांतून एकूण १ कोटी २७ लाख ३१ हजार २०२ रुपये संबंधित कंपनीच्या खात्यात जमा केले. मात्र, त्यानंतर या व्यवहाराबाबत संशय निर्माण झाल्याने त्याने पोलिसांकडे तक्रार केली.

सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विशाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास सायबर पोलीस करीत आहेत.

# शालेय विद्यार्थ्यांना परसबागमुळे झाली शेतीची ओळख

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ३१, सेक्टर–७, कोपरखैरणे येथे विकसित करण्यात आलेल्या ‘परसबागे’ला पालिकेच्या उद्यान विभागाच्या उपायुक्त स्मिता काळे यांनी भेट देऊन उपक्रमाची पाहणी केली. यावेळी भाजपाच्या नगरसेविका तथा विधी विभागाच्या सभापती सायली शिंदे उपस्थित होत्या. नगरसेविका शिंदे यांनी देखील या उपक्रमाचे कौतुक केले.



शाळेच्या माजी मुख्याध्यापिका रुपाली रमाकांत गावंड व डॉ. सुहासी प्रशांत गरुडे–कारंडे यांच्या संकल्पनेतून शालेय पोषण आहार योजनेंतर्गत ही परसबाग विकसित करण्यात आली आहे. सध्याचे मुख्याध्यापक मारुती गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ शिक्षिका अंजली पितळे, इकोक्लबचे सदस्य सचिन आमडोस्कर, भावेश सर, कर्मचारी कैलास पाटील, शिक्षकवृंद व विद्यार्थी वर्गाने सहभाग घेतला होता.

शहरी परिसरात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना कृषीप्रधान भारताची ओळख, वनस्पतीजीवनाचे प्रत्यक्ष ज्ञान, श्रमप्रतिष्ठा, निसर्गप्रेम आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या परसबागेच्या माध्यमातून केले जात आहे. पुस्तकातील ज्ञानाला प्रत्यक्ष कृतीची जोड मिळत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षण, प्रयोगशीलता, जबाबदारी आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचे संस्कार रुजत आहेत.

यावेळी अधिकारी स्मिता काळे व सायली शिंदे यांनी उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

# धोकादायक इमारती तातडीने रिकाम्या करा : आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

अतिधोकादायक सी १ कॅटेगरीतील इमारतींच्या सद्यस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून त्याठिकाणी कोणतीही दुर्घटना घडू नये याची खबरदारी घेत तेथील वीज, पाणीपुरवठा, मलनिःस्सारण वाहिन्या तातडीने खंडीत कराव्यात व त्या इमारती रिकाम्या करण्याची कार्यवाही तत्परतेने करावी असे निर्देश देत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी महापालिका क्षेत्रातील विनावापरातील पडीक बांधकामांचेही विभागवार तातडीने सर्वेक्षण करून अशी बांधकामेही कोणत्याही प्रकारची हानी होऊ नये यादृष्टीने निष्कासनाची कार्यवाही तातडीने प्रस्तावित करावी व त्याची अंमलबजावणी करावी असे निर्देश दिले.



महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या आढावा बैठकीप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व डॉ.राहुल गेठे, प्रशासन विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिग्विजय चव्हाण आणि इतर विभागप्रमुख उपस्थित होते.

इतर शहरांत घडणा–या दुर्घटनांच्या पार्श्वभूमीवर आपण सतर्क होण्याची गरज असून नवी मुंबई शहरात ठिकठिकाणी भरणारे कोचींग क्लासेस, शिकवणी वर्ग यांचे तातडीने अग्निशमन ऑडिट करून घ्यावे असे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले. महानगरपालिका क्षेत्रातील सर्व कोचींग क्लासेस, शिकवणी वर्ग भरविणा–या व्यक्ती / संस्था यांनी नवी मुंबई महानगरपालिका परवाना विभागामध्ये आपले स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी सर्टिफिकेट तसेच अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र आणि पूरक कागदपत्रे जमा करणेबाबत सूचना जाहीर करावी असेही निर्देश यावेळी आयुक्त महोदयांनी दिले.

शहरात ठिकठिकाणी लागणा–या बॅनर्स आणि होर्डींगमुळे शहर विद्रुपीकरण होते शिवाय ते विनापरवानगी लावले जात असल्याने महानगरपालिकेच्या महसूलावरही परिणाम होतो. यादृष्टीने तातडीने लोकप्रतिनिधींच्या सूचनांसह होर्डींगबाबतचे धोरण तयार करावे आणि त्यास महापालिकेची मान्यता घेऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याची कार्यप्रणाली अंमलात आणावी असेही आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले.

शहरातील वाढत्या फेरीवाल्यांमुळे रहदारीवर तसेच स्वच्छतेवरही परिणाम होत असून याकडे गांभिर्याने लक्ष देण्याचे निर्देश देत मा.न्यायालयाच्या आदेशानुसार त्याविरोधातील मोहीमांची तीव्रता वाढवावी, दंडात्मक तरतूदींमध्ये वाढ करावी तसेच निश्चित केलेल्या हॉकर्स झोनमध्ये अधिकृत फेरीवाल्यांना बसवून रस्ते, पदपथ मोकळे राहतील यासाठी धोरण तयार करण्याचेही निर्देशित करण्यात आले. त्याचप्रमाणे परवाना देण्याच्या कार्यप्रणालीकरिता अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याचेही निर्देश आयुक्तांनी दिले.

खड्डेमुक्त रस्त्यांसाठी दक्ष ॲपचा प्रभावी वापर करावा तसेच कचरागाड्यांवरही कॅमेरे लावून रस्त्यांच्या स्थितीवर लक्ष ठेवण्याची व आवश्यक तेथे सुधारणा करण्याची नियमित प्रणाली राबविण्याचे निर्देश देण्यात आले.

घनकचरा व्यवस्थापन नियमाच्या अनुषंगाने दररोज १०० किलोपेक्षा जास्त कचरा निर्माण करणा–या सोसायट्यांपर्यंत पोहचून त्यांना शासकीय पोर्टलवर नोंदणी करण्याच्या सूचना द्याव्यात व त्यांच्या कच–याची त्यांच्या आवारातच विल्हेवाट लावणारे प्रकल्प राबविण्यासाठी प्रोत्साहित करावे असेही सूचित करण्यात आले.

सार्वजनिक व सामुदायिक शौचालय व्यवस्थापन सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागाने घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या समन्वयाने करावे व तेथील व्यवस्था नागरिकांना समाधानकारक राहील याकडे विशेष लक्ष देण्याचेही सूचित करण्यात आले.

नमुंमपा शालेय विद्यार्थ्यांना १५ ऑगस्टपर्यंत शालेय गणेवश वाटप होतील यादृष्टीने नियोजन करावे असे निर्देश शिक्षण विभागास देण्यात आले तसेच आरोग्य विभागाने पावसाळी आजारांच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना नियमित सुरू ठेवाव्यात व आवश्यक औषधसाठी उपलब्ध करून ठेवावा असेही निर्देशित करण्यात आले.

महानगरपालिकेकडे विविध करांच्या रूपाने जमा होणा–या निधीतूनच विकासकामे करण्यात येत असल्याने महसूलवाढीकडे सर्व विभागांनी लक्ष द्यावे आणि आपले उद्दिष्ट पूर्ण होण्याच्या दृष्टीने नियोजनबध्द पावले उचलावीत असेही संबंधित विभागांना आयुक्तांनी निर्देशित केले. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत झालेल्या विविध ठरावांच्या अनुषंगाने विनाविलंब उचित कार्यवाही करण्याचेही निर्देश आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी या आढावा बैठकीत दिले.

# क्रिकेट प्रशिक्षक दिनेश लाड यांना रोटरीचा ‘व्होकेशनल एक्सलन्स अवॉर्ड २०२६’

**पनवेल : वार्ताहर**

भारतीय क्रिकेटला रोहित शर्मा, शार्दूल ठाकूर यांसारखे आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडवणारे प्रख्यात क्रिकेट प्रशिक्षक दिनेश लाड यांना रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१च्या वतीने ‘व्होकेशनल एक्सलन्स अवॉर्ड २०२६’ प्रदान करून गौरविण्यात आले. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१चे प्रांतपाल नितीन ढमाले आणि पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



यावेळी पीडीजी रोटेरियन डॉ. शैलेश पालेकर यांनी दिनेश लाड यांची प्रकट मुलाखत घेतली. या मुलाखतीत लाड यांनी आपल्या संघर्षमय जीवनप्रवासासह क्रिकेट क्षेत्रातील अनेक प्रेरणादायी अनुभव सांगितले. लाड यांनी सांगितले की, त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात कोलगेट कंपनीत नोकरी करून केली. त्यानंतर रेल्वेत खलाशी आणि नंतर लिपिक (क्लार्क) म्हणून काम केले. पुढे माजी भारतीय क्रिकेटपटू प्रवीण आमरे यांच्या माध्यमातून शाळेत क्रिकेट प्रशिक्षक म्हणून कारकिर्दीची सुरुवात झाली.

गुरुवर्य रमाकांत आचरेकर यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना ते म्हणाले, "आचरेकर सरांनी मला पांढरा ड्रेस आणि शूज दिले. ते फक्त माझे गुरू नव्हते, तर माझे सर्वस्व आहेत." १९९० मध्ये आचरेकर सरांना हा सन्मान मिळाला होता आणि त्यानंतर तब्बल ३२ वर्षांनी मला हा गौरव मिळाल्याचा आनंद असल्याचे त्यांनी सांगितले.

रोहित शर्माबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, सुरुवातीला रोहित हा गोलंदाज होता. मात्र त्याच्या गुणवत्तेचा अंदाज घेऊन त्याला सलामीवीर (ओपनर) म्हणून फलंदाजी करण्यास प्रोत्साहन दिले. शालेय सामन्यात त्याची गोलंदाजी पाहून प्रभावित झाल्यानंतर त्याला आपल्या शाळेत मोफत प्रवेश (फ्री–शिप) मिळवून दिला. त्याच्या प्रगतीसाठी स्वतःच्या भविष्यनिर्वाह निधीतील (Provident Fund) पैसे काढून घर घेण्यापर्यंत मदत केली. २००९ ते २०११ या काळात रोहितची भारतीय संघात निवड झाली नव्हती. त्यावेळी क्रिकेटला अधिक वेळ आणि मेहनत देण्याचा सल्ला दिल्यानंतर रोहितने कठोर परिश्रम करून दमदार पुनरागमन केले. "रोहित शर्मा २०२७ चा विश्वचषक निश्चित खेळेल," असा ठाम विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मार्गदर्शन करताना दिनेश लाड यांच्या कार्याचे कौतुक केले आणि मुंबईत क्रिकेट प्रशिक्षणासाठी त्यांना कायमस्वरूपी मैदान उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून वेळ घेणार असल्याचे आश्वासन दिले. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१चे प्रांतपाल नितीन ढमाले यांनी प्रमुख पाहुणे म्हणून मनोगत व्यक्त करत दिनेश लाड यांच्या सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील कार्याचे विशेष कौतुक केले.

यानंतर प्रांतपाल नितीन ढमाले, आमदार प्रशांत ठाकूर आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दिनेश लाड यांना 'व्होकेशनल एक्सलन्स अवॉर्ड २०२६' प्रदान करण्यात आला. याप्रसंगी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१चे पीडीजी डॉ. गिरीश गुणे, डॉ. दीपक पुरोहित, डॉ. हळदीपुरकर, मंजू फडके, डीजीएन विवेक दीक्षित, रो. नितीन मुळे, रो. उज्ज्वल केले, रो. जिग्नेश पंड्या, सर्व असिस्टंट गव्हर्नर, विविध रोटरी क्लबचे अध्यक्ष आणि मोठ्या संख्येने रोटेरियन्स उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रो. धनी तन्ना यांनी केले,

# नेरूळ येथे तिरंगा रॅली, कलश वितरण सोहळ्याचे आयोजन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या माध्यमातून नेरुळ येथील शिरवणे विद्यालय व ज्युनियर कॉलेज मध्ये कलश वितरण सोहळा आणि तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आमदार मंदा म्हात्रे, महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत,प्राचार्या भाग्यश्री चौधरी, ठाणे कोकण संवादक अभिजीत पेडणेकर,आजी माजी नगरसेवक, नगरसेविका, भाजपा मंडळ अध्यक्ष, पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक आणि विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, "तिरंग्यासाठीचे बलिदान हे नव्या पिढीपर्यंत पोहचलं पाहिजे. कारण पुढची पिढी ही देशाचं भवितव्य आहे. आणि मला खात्री आहे की, या देशातील युवक युवती पंतप्रधान मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या खांद्याला खांदा लावून देशासाठी काम करतील.



याप्रसंगी महापौर सुजाता पाटील यांनी सांगितले की, "तिरंगा फक्त हातात न घेता तो मनामनात रुजवायचा आहे. आज इथे जमलेल्यांमध्ये प्रत्येकाचे विचार वेगळे आहेत, प्रत्येक पिढीमध्ये अंतर आहे. परंतु तिरंगा हातात घेतल्यावर कोणामध्ये अंतर राहत नाही, सगळे एक होऊन जातात. त्या सर्वांच्या मनात देशभक्ती रुजवायची आहे. म्हणून या तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले असे त्यांनी सांगितले.

ज्या शूर क्रांतिकारकांच्या बलिदानाने आपल्याला स्वातंत्र्य मिळालं आहे. त्यांचं स्मरण होणं गरजेचं आहे. आज बलिदानाची गरज नसली तरी राष्ट्राप्रति समर्पणाची भावना निर्माण व्हावी यासाठी या तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच संत रविदास महाराज यांच्या सप्टेंबरमध्ये येणाऱ्या जयंतीनिमित्त प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी महाराजांच्या जन्मस्थान वाराणसी येथे जाऊन तेथील माती कलशातून आणली आहे, तिचे सीबीडी बेलापूर ते ऐरोलीपर्यंत १३ मंडळांमध्ये वितरित करण्यात आले असून त्याची विधिवत पूजा करून यात्रा निघेल, व त्यातून संत रविदास महाराजांचे विचार सर्वांपर्यंत पोहचवण्यात येतील", असे डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात तिरंगा अभियानांतर्गत विविध उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात "हर घर तिरंगा" अभियान पनवेल महानगर पालिका आयोजित –पालिकेच्या संयुक्त विद्यमाने आले होते. १५ ऑगस्टचे औचित्यसह दि. १४ ऑगस्ट या दिवशी विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी तिरंगा प्रतिज्ञा, रांगोळी स्पर्धा आणि विशेष प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते . विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रांगोळीच्या माध्यमातून तिरंग्याचे महत्व , राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश मांडला. प्रदर्शनामध्ये भारतीय स्वातंत्र्य लढा , राष्ट्रध्वजाचे महत्व आणि देशभक्तीशी संबंधित विविध माहिती व कलाकृती सादर करण्यात आल्या. तसेच तिरंगा प्रतिज्ञे द्वारे विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्याची आणि आपली जबाबदारी जपण्याची प्रतिज्ञा घेतली.




# माणगावात तिरंगा रॅलीस मोठा प्रतिसाद

## ■ देशभक्तीच्या जल्लोषाने शहर दुमदुमले

**माणगाव : प्रतिनिधी**

देशासाठी बलिदान देणाऱ्या वीर जवानांना अभिवादन करण्यासाठी आणि नव्या पिढीच्या मनात राष्ट्रप्रेमाची ज्योत अधिक प्रखर करण्यासाठी माणगाव शहरात १४ ऑगस्ट रोजी भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन समस्त माणगावकरांच्यावतीने करण्यात आले होते. या रॅलीत 'तिरंगा हातात घेऊन,देशप्रेम मनात' ठेवीत नागरिक,विविध शाळा,अकॅडमी,संस्था संघटनांचे संचालक,शिक्षकवर्ग विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या कार्यक्रमानिमित्त शहीद कुटुंबीय,माजी सैनिकांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेली ही रॅली माणगाव शहरातील देशभक्तीचा जागर ठरली. बालाजी कॉम्प्लेक्स येथून सकाळी १० वाजता रॅलीला सुरुवात होऊन कचेरी रोडमार्गे शहीद वीर यशवंतराव घाडगे स्मारकापर्यंत रॅली काढण्यात आली. या रॅलीत सहभागी झालेल्या सर्वांच्याच हातात तिरंगा ध्वज होता. राष्ट्रध्वज आणि मनात देशप्रेम घेऊन नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी,शिक्षकांनी या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

देशाच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या वीर जवानांचे योगदान शब्दांत मावणारे नाही. त्यांच्या त्यागाची आणि शौर्याची आठवण पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या भावनेतून शहीद कुटुंबीय आणि माजी सैनिकांचा विशेष सन्मान या कार्यक्रमात करण्यात आले. त्याचबरोबर पोलीस भरती अकादमीच्या संचालकांचा, विविध शैक्षणिक संस्थांचा आणि सोशल मीडिया क्षेत्रात देशप्रेमाचा संदेश पोहोचविणाऱ्या इन्फ्लुएन्सर्सचा सत्कार करण्यात आला. रॅलीदरम्यान देशप्रेमावरआधारित पथनाट्याचे सादरीकरण उत्कृष्टपणे करण्यात आले. मनोरंजनासोबतच सामाजिक आणि राष्ट्रीय बांधिलकीचा संदेश देणाऱ्या या पथनाट्यातून युवकांना राष्ट्रसेवा, शिस्त, त्याग आणि जबाबदारीची जाणीव करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.



# अलिबागमध्ये तिरंगा बाईक रॅलीने जागवला देशभक्तीचा उत्साह



**अलिबाग : प्रतिनिधी**

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर देशभक्तीची भावना अधिक प्रबळ करण्यासाठी अलिबाग नगरपरिषदेच्या वतीने शुक्रवारी (दि. १४ ) 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. हातात तिरंगा घेऊन मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या दुचाकीस्वारांमुळे अलिबाग शहरात देशभक्तीचा उत्साह ओसंडून वाहत होता. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्'च्या घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले.

अलिबाग नगरपरिषद कार्यालय परिसरातून रॅलीला सुरुवात झाली. हातात अभिमानाने फडकणारा राष्ट्रध्वज आणि मनात देशप्रेमाची भावना घेऊन नागरिक मोठ्या उत्साहाने रॅलीत सहभागी झाले. तिरंग्याच्या रंगांनी सजलेले वातावरण, देशभक्तीपर गीतांची धून आणि तरुणाईचा सळसळता उत्साह यामुळे अलिबागमध्ये स्वातंत्र्य दिनाच्या उत्सवाची जणू पूर्वपीठिकाच रंगली होती.

रॅलीदरम्यान नागरिकांमध्ये राष्ट्रध्वजाबाबत आदर आणि देशभक्तीची भावना जागृत करण्याचा संदेश देण्यात आला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करत राष्ट्रीय एकात्मता आणि देशाप्रती असलेली जबाबदारी याची जाणीव करून देणारे वातावरण निर्माण झाले. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी रॅलीत सहभागी होत नागरिकांचा उत्साह वाढवला. अलिबाग नगराध्यक्षा अक्षया नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, नगरसेवक, नगरपरिषदेचे अधिकारी-कर्मचारी तसेच अलिबाग शहरातील नागरिक मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाले होते.तिरंगा हातात घेऊन एकाच घोषणेत सहभागी झालेल्या नागरिकांमधून 'एक देश, एक भावना' असा संदेश अधोरेखित झाला. विविधतेत एकता ही भारताची ओळख असून, राष्ट्रध्वज हा प्रत्येक भारतीयाच्या अभिमानाचे प्रतीक आहे, ही भावना रॅलीतून प्रकर्षाने जाणवली.अलिबाग समुद्रकिनारी रॅलीची सांगता करण्यात आली.

# नागाव बीच येथे २१ ऑगस्टला भव्य नारळ फोडी स्पर्धा

**नागाव : प्रतिनिधी**

डॉ. सचिन शरद राऊळ व श्री. राकेश अनंत राणे मित्रमंडळाच्या वतीने नागाव बीच, अलिबाग येथे २१ ऑगस्ट २०२६ रोजी भव्य नारळ फोडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमुळे परिसरातील नारळ फोडीच्या पारंपरिक खेळाला उत्साहाचे स्वरूप प्राप्त होणार आहे.

स्पर्धेचे आयोजन दोन गटांत करण्यात आले असून, दुपारी २ वाजता 'गडगडी नारळ फोडी स्पर्धा', तर संध्याकाळी ६ वाजता 'हातावरची नारळ फोडी स्पर्धा' होणार आहे. गडगडी स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क १ हजार रुपये, तर हातावरची स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क २ हजार रुपये ठेवण्यात आले आहे.

गडगडी स्पर्धेत प्रथम क्रमांकासाठी २१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ११ हजार रुपये, तर तृतीय व चतुर्थ क्रमांकासाठी प्रत्येकी ७ हजार रुपयांचे रोख पारितोषिक ठेवण्यात आले आहे. तसेच उत्कृष्ट मारकेरीसाठी आकर्षक ट्रॉफी देण्यात येणार आहे. हातावरची नारळ फोडी स्पर्धेत प्रथम क्रमांकासाठी ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ११ हजार रुपये व तृतीय क्रमांकासाठी ११ हजार रुपयांचे पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे.

स्पर्धेच्या नोंदणीसाठी २० ऑगस्ट २०२६ ही अंतिम तारीख असून, स्पर्धकांनी दिलेल्या संपर्क क्रमांकावर नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.स्पर्धेसाठी विपुल राऊळ ७७९८६४२२१४ आणि शैलेश नाईक ९८५०२३१५९५ यांच्याशी संपर्क साधता येणार आहे. स्पर्धेचे ठिकाण श्री सोमेश्वर मंदिर क्रीडांगण, नागाव बीच जवळ, अलिबाग, रायगड असे आहे.

# महाडमध्ये प्रतिबंधित पानमसाल्याचा साठा जप्त

**महाड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थांची बेकायदा साठवणूक आणि विक्री करणाऱ्यांविरोधात अन्नसुरक्षा विभागाने महाड शहरात धडक मोहीम सुरू केली असून, या मोहिमेअंतर्गत गुरुवार १३ ऑगस्ट रोजी डोंगरे गल्ली परिसरातील एका दुकानावर कारवाई करून प्रतिबंधित पानमसाल्याचा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी संबंधित दुकानदारास महाड शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

डोंगरे गल्ली परिसरातील एका इमारतीमध्ये जालिंदर रामचंद्र निकम -३९ रा. नवीपेठ, महाड. यांचे दुकान आहे. या दुकानात प्रतिबंधित पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा असल्याची माहिती मिळाल्यानंतर अन्नसुरक्षा विभागाच्या पथकाने दुकानाची तपासणी केली. तपासणीदरम्यान ' आरोग्यासाठी हानिकारक असलेला सॅफ्रॉन ब्लेंडेड विमल पानमसाला'ची ५७ पाकिटे आढळून आली. अन्नसुरक्षा विभागाने हा साठा ताब्यात घेतला असून, जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत ६ हजार १५६ रुपये असल्याचे कारवाईच्या नोंदीत नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर अन्नसुरक्षा विभागाकडून करण्यात आलेल्या तपासणीत दुकानात प्रतिबंधित पदार्थांचा साठा आढळून आल्याने संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली.अन्नसुरक्षा विभागाच्या कारवाईनंतर या प्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक नारायण एकशिंग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.

# खालापूर आरोग्य केंद्रात जन आरोग्य यंत्रणेची सभा

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्या व जन आरोग्य समिती अध्यक्ष रेश्माताई पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली.यावेळी सभापती कृष्णा पारंगे व उप सभापती भाई शिंदे उपस्थित होते.



जन आरोग्य समिती, आयुष्मान भारत अंतर्गत आरोग्य आणि कल्याण केंद्रांच्या (HWC) स्तरावर समुदाय सहभाग वाढवण्यासाठी जन आरोग्य समिती (JAS) स्थापन करण्याचे शासन निर्णय राष्ट्रीय आरोग्य अभियाना द्वारे लागू केले आहेत.ही समिती गावपातळीवर आरोग्य सेवा सुधारणे, स्वच्छता व जनजागृती करण्याचे काम करते. आरोग्य केंद्रांमधील सेवांचा दर्जा व स्वच्छता राखणे,शासनाच्या विविध आरोग्य योजनांची गावात माहिती पोहोचवणे, रुग्णांच्या तक्रारी ऐकणे व त्यावर उपाय शोधणे. अशा विविध प्रकारच्या योजना समितीच्या माध्यमातून राबिवल्या जात असतात त्याच अनुषंगाने रायगड जिल्हा परिषद सदस्या रेश्मा राजेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली खालापूर प्राथमिक केंद्रात जन आरोग्य समिती स्थापन करण्यात आली असून त्याची पहिली सभा पार पडली.

कारगाव येथील हिंदवी पांडुरंग साळुंखे - फिजिओ डॉक्टर थेरीपीस्ट (PT) झाल्याबद्दल व करुणा दिनेश पाटील चिंचवली गोहे यांनी वकील पद्वी प्राप्त केल्या बद्द्ल त्यांचे अभिनंदन व सत्कार करण्यात आला. विविध आरोग्य विषयक चर्चा करण्यात आल्या. चार वर्षाच्या कालावधीनंतर जन आरोग्य समितीची सभा झाली मागील केलेल्या काम काजा बद्दल माहिती घेण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना सुख सोयी सुविधा उपलब्ध कशा होतील याबाबत चर्चा करण्यात आली.

# लायन्स क्लब मुरुड जंजिरातर्फे पदग्रहण व शपथविधी सोहळा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील बोर्ली येथे मुरुड जंजिरा लायन्स क्लब तर्फे नवीन कार्यकारणी चा पदग्रहण व शपथविधी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला

यावेळी मावळते अध्यक्ष सनी सोगावकर यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष सी. एम. ठाकूर यांच्याकडे पदभार देताना माजी जिल्हा प्रांतपाल संजीव सूर्यवंशी यांच्या हस्ते पदग्रहण करण्यात आले तसेच खजिनदारपदी मकरंद कर्णिक व सेक्रेटरीपदी साजिद शेख यांची निवड करण्यात आली तसेच लायन्स क्लब ग्लोबल सर्विस टीमचे जिल्हाधक्ष अनिल म्हात्रे यांनी नवीन कार्यकारणी व सदस्य यांना मार्गदर्शन व शपथविधी सोहळा पार पडला

ग्लोबल सर्विस टीम तर्फे विद्यार्थ्यांना मोफत वह्या व छत्री यांचे वाटप केले तसेच शाळांसाठी मेडिकल किटचे वाटप केले याप्रसंगी लायन्स क्लब अलिबाग माजी अध्यक्ष प्रदीप नाईक, ला. अविनाश घरत, जिल्हा सेक्रेटरी नयन कवळे, ला. महेंद्र पाटील, ला. विजय वनगे, श्रुती पालवणकर, नथुराम कांबळी, भारत मोती, रवींद्र भोवर इत्यादी उपस्थित होते.



# हेल्प फाउंडेशन सदस्यांनी वाचविले खोपोलीत नदीत बुडणाऱ्या युवकाचे प्राण

**खोपोली : प्रतिनिधी**

आज हेल्प फाउंडेश सदस्य अमोल कदम याने वॉटर रेस्क्यूमधील आपला अनुभव पुन्हा एकदा पणाला लावला. भक्तीचा निरोप मिळताच अमोलने महेश भोसले याच्या सोबत आयओसी ब्रिजवरून पाताळगंगा नदीपात्रात शोधमोहीम सुरू केली. ज्या महिलेने त्या व्यक्तीला पाण्यात बुडताना पाहिले होते, तिचा मुलगा इम्रान शेख हादेखील मदतीसाठी त्यांच्यासोबत होता.



शोध सुरू असतानाच अमोलने एक महत्त्वाचा निर्णय घेतला. इतरांकडून शोध घेत असताना तो प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने पाण्यात उतरला. त्याचा हाच निर्णय निर्णायक ठरला.

आय ओ सी ब्रिजच्या काही अंतरावर त्याला तो युवक पाण्यात गटांगळ्या खाताना दिसला. तेथल्या परिस्थितीचा आनंद घेऊन क्षणाचाही विलंब न करता अमोलने त्याच्यापर्यंत पोहोचून त्याला सुरक्षितपणे रेस्क्यू केले. या संपूर्ण प्रयत्नात महेश भोसले आणि इम्रान शेख यांचीही मोलाची साथ मिळाली.अखेर त्या युवकाला आयओसी ब्रिजजवळ सुरक्षितपणे आणण्यात आले.

पूर्वानुभव आणि प्रसंगी योग्य निर्णय घेण्याची क्षमता यांचा संगम झाला की, एखाद्याचा जीव वाचवता येतो. हाच फॉर्म्युला आज अमोल कदमने पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवला .

सदर व्यक्तीचे नाव सचिन असे असून त्याला खोपोली नगरपालिका हॉस्पिटल येथे दाखल केली असून. खोपोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्याकडून पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली जात आहे.

# खारआंबोळी गावात सामुदायिक शेतीचे उत्तम उदाहरण

## पारंपरिक गीते गात २५० गावकऱ्यांनी केली भाताची राब पेरणी

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

एकीकडे कोकणात शेतीचा कल कमी होत आसतना रायगडमध्ये मुरुड तालुक्यात खारआंबोळी गावात २५० गावकर्यांनी देवळासमोरील शेतीत भात लावणी पारंपरिक गीते बोलत जुलैला भात लावणी करतात

.गावागावातील मतभेद विसरून गावच्या शेतात हाक दिल्याबरोबर पुरुष सकाळी ७ वाजल्यापासून कामाला येतात . पेरणी काम लवकर व्हावे म्हणून पारंपरिक पद्धत आजही वापरतात कोणत्याही मशीनचा वापर करत नाही. गावातील मंडळी कुशल कामगार असल्याने बाहेर दिवसाला १ हजार मजुरी घेणारे देखील गावच्या पेरणीच्या कामाला स्वतःहून हजर राहतात उदेश्यो मतभेद विसरून आनंदात माणुसकीची मूल्य जपण्याचा असतो .महिला पुरुषांना टोमणे मारतात .तर पुरुष महिलांना मुंबईला जातो असे टोमणे मारून सगळ्यांच्या चेहऱयावर हसू आणतात अशी परंपरा कोठे पाहायला मिळत नाही ,त्यासाठी हे गाव प्रसिद्ध आहे ह्यावर्षी पावसाने खुप नुकसान केले तरीही वाचलेले भात आनंदने लावताना महिला दिसत आहेत

.तालुक्यात ३ हजार हेक्टर जमिनीवर भात शेती केली जाते.भात पीक हे मुख्य पीक आहे.खारआंबोळी गावची शेती सर्वात शेवट लावतात .कारणं अनेक ठिकाणी अति पावसाने गावकऱ्यांचे राब वाहवून जातात .त्यामुळे गावची शेती लावून झाल्यावर उरलेले राब गावकर्यांना देण्यात येते असा सार्वजनिक हिताचा विचार हा गाव जपतो .ह्या गावची लावणी पाहण्यासाठी छयाचित्रकार व पर्यटक देखील आवर्जून भेट देतात.



# कलोते प्लास्टिक संकलन केंद्राची मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी केली पाहणी

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील कलोते ग्रामपंचायत हद्दीतील तालुकास्तरीय प्लास्टिक संकलन केंद्रास रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले यांनी भेट देऊन पाहणी केली.यावेळी य जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

प्लास्टिक संकलन केंद्र म्हणजे असाऊंड किंवा जागा जिथे टाकाऊ प्लास्टिक गोळा करून पुनर्वापरा कामी पाठवले जाते.खालापूर तालुक्यात हे केंद्र कलोते ग्राम पंचायत हद्दीत आहे.घरातील किंवा परिसरातील प्लास्टिक पिशव्या, बाटल्या व इतर टाकाऊ वस्तू येथे जमा करण्यात येईलं प्लास्टिकच्या प्रकारानुसार त्याची वर्गवारी करण्यात येणार आहे.गोळा केलेले प्लास्टिक रिसायकलिंग युनिट्सकडे पाठविण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. यामुळे प्रदूषण कमी करणे व परिसर स्वच्छ करण्याचा उद्देश आहे.

यावेळी प्रकल्प संचालक DRDA प्रियदर्शनी मोरे,कार्यकारी अभियंता मोहन सरोदे, उपमुख्य



कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) विशाल तनपुरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) श्रीमती शुभांगी नाखले, गटविकास अधिकारी संदिप कराड, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक जयवंत गायकवाड उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी लास्टिक संकलन केंद्राची पाहणी करून प्लास्टिक संकलन, वर्गीकरण व व्यवस्थापनाच्या कामाबाबत संबंधितांना मार्गदर्शन केले. ग्रामीण पाणीपुरवठा संतोष चव्हाण, विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल,विनोद चांदोरकर, कनिष्ठ अभियंता मयुरी खाडे, पूनम म्हात्रे, प्रशासक अमित म्हसकर ग्रामपंचायत अधिकारी निलेश म्हसकर, समूह समन्वयक संदीप मोगारे, रविकिरण राठोड, उपस्थित होते.

# गॉल कसोटीत फिरकीचा कस

## टीम इंडियासमोर जयसूर्या-मेंडिसचे आव्हान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि श्रीलंका यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेला १५ ऑगस्टपासून सुरुवात होत आहे. मालिकेतील पहिला सामना गॉल इंटरनॅशनल स्टेडियमवर रंगणार असून शुबमन गिलच्या नेतृत्वाखालील टीम इंडियासाठी हा सामना महत्त्वाचा ठरणार आहे. ही मालिका आयसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५-२७चा भाग असल्याने दोन्ही संघांसाठी विजयाचे महत्त्व अधिक आहे.



गॉलची खेळपट्टी सामन्याच्या पुढील टप्प्यात फिरकी गोलंदाजांना मदत करते. त्यामुळे भारतीय फलंदाजांसमोर श्रीलंकेच्या प्रभात जयसूर्या आणि रमेश मेंडिस यांच्या फिरकीचे मोठे आव्हान असेल. घरच्या मैदानावर या दोन्ही गोलंदाजांचा अनुभव आणि कामगिरी श्रीलंकेसाठी महत्त्वाचे अस्त्र मानले जात आहे. भारतीय संघ मागील काही काळात फिरकीविरुद्ध अपेक्षेप्रमाणे सातत्यपूर्ण कामगिरी करण्यात संघर्ष करताना दिसला आहे. त्यामुळे गॉलमध्ये फिरकीला योग्य पद्धतीने सामोरे जाणे हा टीम इंडियाच्या फलंदाजीसमोरील प्रमुख प्रश्न असेल. भारतीय फलंदाजांनी सुरुवातीपासूनच संयम राखून खेळण्याची गरज आहे.

या परिस्थितीचा विचार करता भारतीय संघाच्या प्लेइंग-११ मध्ये तीन डावखुरे फिरकी गोलंदाज खेळण्याची शक्यता चर्चेत आहे. कुलदीप यादव, रवींद्र जडेजा आणि मानव सुथार या तिघांना एकत्र संधी देण्याचा पर्याय टीम मॅनेजमेंटसमोर आहे. भारताचे गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्ने मॉर्केल यांनीही या तिघांच्या वेगवेगळ्या शैलींचा संघाला फायदा होऊ शकतो, असे संकेत दिले आहेत. भारताला या मालिकेपूर्वी काही धक्केही बसले आहेत. वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह मालिकेतून बाहेर आहे, तर साई सुदर्शन दुखापतीमुळे उपलब्ध नसल्याने त्याच्या जागी सरफराज खानचा संघात समावेश करण्यात आला आहे.

श्रीलंकेने पहिल्या कसोटीसाठी धनंजया डी सिल्वाच्या नेतृत्वाखाली १६ सदस्यीय संघ जाहीर केला. अनुभवी यष्टिरक्षक-फलंदाज निरोशन डिकवेला संघात परतला आहे, तर दुखापतीमुळे कुसल मेंडिस मालिकेतून बाहेर आहे. गॉलमध्ये फिरकी, हवामान व क्रॉसविंड्स सामन्याच्या रणनीतीवर प्रभाव टाकू शकतात. पहिल्याच दिवसापासून परिस्थितीचा अंदाज घेत योग्य संयोजन निवडणे दोन्ही संघांसाठी निर्णायक ठरेल. १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या कसोटीत टीम इंडिया श्रीलंकेच्या फिरकीचा सामना कसा करते, याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

# क्रिकेटपटू मिचेल स्टार्ककडून कपिल देवचा विक्रम मोडीत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने अजून एक विक्रम आपल्या नावे केला आहे. बांगलादेश आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पहिला कसोटी सामना खेळवला जात आहे. या कसोटी सामन्यात बांगलादेश संघाने ऑस्ट्रेलियाला घरच्या मैदानावर कसोटीत मागे टाकले आहे. दरम्यान, मिचेल स्टार्कने या सामन्यात पहिली विकेट घेत वर्ल्ड रेकॉर्ड केला होता. आता दुसरी विकेट घेताच त्याने कपिल देव यांचा विक्रम मोडला आहे.

ऑस्ट्रेलियाचा स्टार वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने कसोटी क्रिकेटमध्ये आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. कसोटीत सर्वाधिक बळी घेण्याच्या बाबतीत त्याने भारताचे दिग्गज खेळाडू कपिल देव यांना मागे टाकले आहे. ऑस्ट्रेलिया आणि बांगलादेश यांच्यात सुरू असलेल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी लिटन दासची विकेट घेत त्याने हा टप्पा गाठला.

स्टार्कने लिटन दासला खातेही उघडू न देता बाद केले आणि या सामन्यातील आपली दुसरी विकेट घेतली. या कामगिरीसह त्याने कपिल देव यांना मागे टाकले. आता सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्यांच्या पहिल्या १० खेळाडूंच्या यादीत स्थान मिळवण्यासाठी त्याला केवळ डेल स्टेनला मागे टाकायचे आहे. सध्या ४३५ विकेट्ससह स्टार्क ११व्या स्थानावर आहे.

लिटन दासची विकेट घेतल्यानंतर स्टार्कच्या कसोटी विकेट्सची एकूण संख्या ४३५वर पोहोचली आहे. कपिल देव यांनी ४३४ विकेट्स घेत कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. आता स्टार्कची नजर कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या पहिल्या १० गोलंदाजांच्या यादीत स्थान मिळवण्यावर आहे. या यादीत ४३९ विकेट्ससह डेल स्टेन १०व्या स्थानावर आहे. त्याला मागे टाकण्यासाठी स्टार्कला आणखी पाच विकेट्स घेण्याची गरज आहे.

# कधीतरी थांबावेच लागेल

## ■ रोहितच्या निवृत्तीवर मॅथ्यू हेडनची प्रतिक्रिया

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा स्टार फलंदाज रोहित शर्मा टी-२० व कसोटी क्रिकेटनंतर वनडे क्रिकेटलाही रामराम करणार, अशा चर्चा गेल्या काही दिवसांपासून रंगल्या होत्या, मात्र या चर्चांना पूर्णविराम देत रोहितने लॉर्ड्सवर इंग्लंडविरुद्ध दमदार शतकी खेळी केली. त्यामुळे रोहित शर्मा २०२७ चा वर्ल्डकप खेळणार, अशी जोरदार चर्चा रंगली आहे. याच पार्श्वभूमीवर ऑस्ट्रेलियाचा माजी खेळाडू मॅथ्यू हेडनने रोहितच्या निवृत्तीबाबत महत्त्वाचे वक्तव्य केले आहे.



भारत आणि इंग्लंड यांच्यातील टी-२० मालिकेत भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यानंतर झालेल्या तीन वनडे सामन्यांच्या मालिकेतही भारताला २-१ने पराभूत व्हावे लागले. मालिकेतील सुरुवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये रोहितचा फ्लॉप शो पाहायला मिळाला. मात्र तिसऱ्या सामन्यात शतक झळकावून त्याने दमदार पुनरागमन केले.

याबाबत एका मुलाखतीत मॅथ्यू हेडन म्हणाला की, जेव्हा वय होते, तेव्हा असे प्रश्न उठायला सुरुवात होते. आधी विराट होता, त्याआधी गंभीरही होता. हे सुरूच राहील. तुम्ही हा सुंदर खेळ कायमस्वरूपी खेळू शकणार नाही. तुम्हाला कधीतरी थांबावे लागेल. जेव्हा तुम्ही कारकिर्दीच्या अशा टप्प्यावर पोहोचता, तेव्हा आयपीएल आधी सुटणार की आंतरराष्ट्रीय क्रिकेट? हा प्रश्न विचारला जाणारच.

# क्रिकेटपटू अभिषेक पोरेलला जामीन नाकारला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बंगाल आणि दिल्ली कॅपिटल्सचा क्रिकेटपटू अभिषेक पोरेल मोठ्या पेचात सापडला आहे. अभिषेक पोरेलला बलात्काराच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. त्याला आता जामीन नाकारण्यात आला असून १४ दिवसीय न्यायालयीन कोठडी ठोठावली आहे.

शुक्रवारी चिनसुरा न्यायालयाने जामीन नाकारत १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत पाठवले. लग्नाचे आश्वासन देऊन लैंगिक संबंध ठेवणे आणि गैरवर्तन केल्याचा आरोप करणाऱ्या तक्रारीनंतर मोगरा पोलिसांनी त्याला अटक केली होती. पोरेलला यापूर्वी ११ ऑगस्ट रोजी न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यानंतर न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. २३ वर्षीय यष्टिरक्षक फलंदाज पोरेल बंगाल संघाचा नियमित सदस्य असून आयपीएलमधील दिल्ली कॅपिटल्सकडूनही खेळतो. दरम्यान, या प्रकरणाचा तपास २३ जूनपासून सुरू आहे.

# हिलीच्या यादीत बुमराह तिसऱ्या, स्टार्क पाचव्या क्रमांकावर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क याने त्याची पत्नी ॲलिसा हिली हिने जगातील एलिट गोलंदाजांच्या क्रमवारीत भारताचा जसप्रीत बुमराह याला त्याच्यापेक्षा वर स्थान दिल्यानंतर भन्नाट प्रतिक्रिया दिली आहे. स्टार्कच्या या शांत आणि विनोदी उत्तराने सर्वांचे लक्ष वेधले आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर सध्या ॲलिसा हिली मैदानापासून दूर आहे. तिने नुकतेच जगातील पाच महान गोलंदाजांची यादी तयार केली. या यादीत ऑस्ट्रेलियाचा दिग्गज फिरकीपटू शेन वॉर्न अव्वल स्थानावर होता. त्यानंतर पॅट कमिन्स, जसप्रीत बुमराह आणि ग्लेन मॅक्ग्राला स्थान देण्यात आले, तर स्टार्कला पाचव्या क्रमांकावर ठेवण्यात आले.



हिलीच्या या क्रमवारीची सोशल मीडियावर जोरदार चर्चा झाली.फॉक्स क्रिकेट या इन्स्टाग्राम पेजवर ॲलिसाचा 'ब्लाइंड रँकिंग' व्हिडिओ शेअर करण्यात आला. या व्हिडिओमध्ये तिला जगातील एलिट गोलंदाजांना क्रमांक द्यायला सांगण्यात आले होते. पहिले नाव शेन वॉर्नचे आले आणि त्याला तिने पहिल्या स्थानी ठेवले. दुसरे नाव जसप्रीत बुमराहचे होते. बुमराहला तिने तिसऱ्या स्थानी ठेवले. त्यानंतर मिचेल स्टार्कचे नाव आले आणि तिने स्टार्कला पाचव्या स्थानी ठेवले. हे ऐकून अँकरदेखील हसू लागला. त्यानंतर ग्लेन मॅक्ग्राला चौथ्या स्थानी तर पॅट कमिन्सला दुसऱ्या स्थानी ठेवण्यात आले.पत्नीने दिलेल्या या क्रमवारीवर स्टार्कने अगदी साध्या आणि विनोदी अंदाजात प्रतिक्रिया दिली.

त्याने कमेंटमध्ये फक्त “No worries” म्हणजेच "काही हरकत नाही" असे लिहिले. त्याची ही सहज प्रतिक्रिया क्रिकेट चाहत्यांना खूपच आवडली. स्टार्कच्या या उत्तरामुळे सोशल मीडियावर चर्चेला आणखी रंग चढला. विशेष म्हणजे, ॲलिसाने आपल्या पतीलाच इतर तीन गोलंदाजांपेक्षा खाली स्थान दिले, त्यामुळे या प्रसंगात विनोदाची भर पडली आणि चाहत्यांनीही त्याचा मनमुराद आनंद घेतला.मिचेल स्टार्क आणि ॲलिसा हिली हे क्रिकेटमधील सर्वाधिक चर्चेत असलेल्या 'पॉवर कपल्स'पैकी एक मानले जातात. मैदानाबाहेर त्यांचे खेळकर आणि मोकळे नातं चाहत्यांना नेहमीच पाहायला मिळते. दोघेही आंतरराष्ट्रीय स्तरावर अत्यंत यशस्वी क्रिकेटपटू असले तरी सोशल मीडियावर ते अनेकदा हलक्या-फुलक्या टोमण्यांत आणि एकमेकांची मजा करण्यात रमलेले दिसतात.













दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com